रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ३४७
www.ramprahar.com
गुरुवार, ४ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'मराठा आरक्षणासाठी शासनाचा सर्वतोपरी प्रयत्न'/२
नायट्रोजन गॅसचा टँकर कशेडी घाटातील दरीत कोसळला/५
टीम इंडिया बार्बाडोसवरून रवाना; आज होणार आगमन/८

## आषाढी वारीसाठी जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी



**मुंबई** : आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी देण्यात आली आहे. पंढरपूरला ३ ते २१ जुलैदरम्यान वारीसाठी जाणाऱ्या वाहनांना पथकरातून सूट असणार आहे. याबाबतचा शासन आदेश बुधवारी (दि.३) राज्य सरकारने जारी केला. पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या, भाविक आणि वारकऱ्यांना 'आषाढी एकादशी २०२४', गाडी क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर नमूद करून आवश्यक त्या संख्येनुसार स्टीकर्स परिवहन विभाग, वाहतूक पोलीस आणि संबंधित आरटीओ यांच्याशी समन्वय साधून उपलब्ध करून द्यावेत. पास परतीच्या प्रवासाकरिता ग्राह्य धरण्यात येतील या प्रमाणे स्टीकर्स तयार करण्यात यावेत. याबाबत पोलीस अधिकाऱ्यांना गृहविभागाबाबत अवगत करण्याबाबत सूचनाही दिल्या आहेत.

# कर्नाळा बँकेतील पनवेल कृउबा समितीचा निधी बुडाला

## ■ दिवाणी न्यायालयात दाव्याची कार्यवाही -पणनमंत्री सत्तार






**मुंबई, पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यवस्थापन समितीने सन २०१०-११पासून केलेल्या गैरकारभारामुळे समितीचे कोट्यवधींचे नुकसान झाल्याचे चौकशी अहवालात नमूद आहे. या बाजार समितीचे संचालक व सदस्यांनी समितीचा निधी बुडीत असलेल्या कर्नाळा सहकारी बँकेमध्ये जमा केल्यामुळे बाजार समितीचे नुकसान झाल्याची बाब खरी असल्याची माहिती राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली.

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता. त्या प्रश्नावर पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिलेल्या उत्तरात स्पष्ट केले आहे.

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कोट्यवधींचा गैरव्यवहार करणाऱ्या संचालक व सदस्यांवर अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आली नसल्याचे मे २०२४मध्ये निदर्शनास आले आहे. या बाजार समितीने सन २०१०-११पासून केलेल्या गैरकारभारामुळे कोट्यवधींचे नुकसान झाल्याचे चौकशी अहवालात नमूद केले असून समितीचे संचालक व सदस्यांनी समितीचा निधी बुडीत कर्नाळा सहकारी बँकेमध्ये जमा केल्यामुळे बाजार समितीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी करून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या झालेल्या नुकसानीची रक्कम वसुलीसाठी तसेच गैरव्यवहार करणाऱ्या संचालक व सदस्यांवर कोणती कारवाई केली असा तारांकित प्रश्न दाखल केला होता.

पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी उत्तरात सांगितले की, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यवस्थापन समितीने सन २०१०-११पासून केलेल्या गैरकारभारामुळे समितीचे कोट्यवधींचे नुकसान झाल्याचे चौकशी अहवालात नमूद आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचेकडील २५ जुलै २०२३ रोजीच्या चौकशी अहवालास अनुसरून विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग यांनी २१ मे २०२४ रोजी बाजार समितीचे सभापती/उपसभापती/सचिव व सदस्यांना नोटीस बजावली आहे. सुनावणीअंती कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती उचित कारवाई केली जात आहे, तसेच आर्थिक नुकसानीबाबत तत्कालीन समिती सदस्यांविरूद्ध न्यायालयात दावा लावण्याकरीता रायगड जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल यांना प्राधिकृत केले असून पनवेल दिवाणी न्यायालय येथे दावा दाखल करण्याची कार्यवाही सुरू केली आहे, अशीही माहिती त्यांनी दिली आहे.

## विवेक पाटीलांच्या जामीन अर्जातील वैद्यकीय बाबींची सुनावणी फेटाळली



### आता १६ जुलैपासून गुणवत्तेनुसार होणार सुनावणी

**पनवेल : प्रतिनिधी**

बोगस कर्ज प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेकानंद पाटील यांच्या जामीन अर्जावर वैद्यकीय कारणावरून सुरू असलेली सुनावणी उच्च न्यायालयाने फेटाळली.

उच्च न्यायालयात न्या. मनीष पितळे यांच्यासमोर बुधवारी (दि.३) सुनावणी झाली. न्यायालयाने याबाबत दोन्ही पक्षाच्या वकिलांकडे स्पष्ट विचारणा केली. या जामीन अर्जावर वैद्यकीय कारणास्तव सुनावणी न करता प्रकरणाच्या गुणवत्तेवर (मेरिटवर) सुनावणी करण्याचे दोन्ही बाजूच्या वकिलांनी मान्य केले.

न्या. मनीष पितळे यांनी पुढील सुनावणी १६ जुलै २०२४ रोजी प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार होईल, असे जाहीर केले. या वेळी उच्च न्यायालयात विवेकानंद पाटील यांच्यातर्फे अ‍ॅड. राहुल ठाकूर उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आर्थिक लूट केल्यास कारवाई

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचना



**मुंबई : प्रतिनिधी**

माझी लाडकी बहीण योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, फॉर्म भरुन घेणे यांसह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास, प्रक्रियेत दिरंगाई केल्यास किंवा महिलांकडून पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि जलदगतीने होईल यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे, या योजनेचे नियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत.

योजनेसाठी नावनोंदणी, अर्ज आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेच्या लाभासाठी पात्र महिलांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देणे तसेच त्यानंतर योजनेचा फॉर्म भरणे आदी संपूर्ण प्रक्रियेसंदर्भात मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि जलदगतीने होईल यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

माता-भगिनींचे आयुष्य बदलवून टाकणाऱ्या विविध योजना राज्य शासनाने आणल्या आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा शासन निर्णयही लगेचच काढण्यात आला. या योजनेतील पात्र महिलांना महिन्याला दीड हजार रुपये म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये राज्य सरकार देणार आहे. यासाठी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना म्हणजे माता-भगिनींना माहेरचा आहेर आहे. नोंदणीसाठी रांगा लावण्याची गरज पडणार नाही, यादृष्टीने चोख नियोजन करावे, लाडक्या बहिणींची कोणत्याही कारणास्तव अडवणूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

### एजंटच्या नादी लागू नका -फडणवीस

लाडकी बहीण योजनेबाबत सर्व भगिनींना विनंती करतो की, एजंटच्या नादी लागू नका. कोणी एजंट येत असेल तर तक्रार करा. अमरावतीमध्ये एका सरकारी कर्मचाऱ्याने गडबड करण्याचा प्रयत्न केला. त्याला नोकरीतून काढून टाकले. सेतू कार्यालय किंवा अंगणवाडी सेविकांना प्रतिफॉर्म ५० रुपये देण्याचा निर्णय राज्य सरकार घेणार आहे. यापेक्षा जास्त पैसे सेतू केंद्राने घेतले तर त्यांचे केंद्र रद्द करण्यात येईल. योजना पारदर्शकपणे राबण्याचा आमचा हेतू आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**(अधिक वृत्त पान २ वर..)**

## अलिबाग शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजना -मंत्री उदय सामंत



**मुंबई** : अलिबाग शहराचे वाढते नागरीकरण लक्षात घेता अलिबाग नगर परिषदेमार्फत नगरोत्थान महाभियानांतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजना तसेच अस्तित्वातील जलवाहिनीचे नूतनीकरण अशा रुपये ४९ कोटी ११ लाख रूपयांच्या कामांना लवकरच सुरुवात करून हा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत सांगितले.

अलिबाग शहरात काही ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. टँकरने पाणीपुरवठा बंद होवून अलिबाग नगर परिषदेकडून पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत प्रश्न सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केला होता.

मंत्री सामंत म्हणाले की, अलिबाग येथील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. नगर परिषदेमार्फत नगरोत्थान महाभियानांतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजना तसेच अस्तित्वातील जलवाहिनीच्या नूतनीकरणासाठी ४९ कोटी ११ लाख रुपयांच्या कामांना मान्यता मिळाली आहे. या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे.

## निवडक

### ठाणे आणि मुलुंडदरम्यान उभारणार नवीन रेल्वेस्थानक

**ठाणे** : ठाणे आणि मुलुंड रेल्वेस्थानकातील गर्दीचा भार कमी करण्यासाठी नवीन रेल्वे स्थानकाची उभारणी करण्यात येत आहे. मनोरूग्णालयाच्या जागेत बांधण्यात येणाऱ्या नवीन रेल्वे संदर्भात रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि.३) बैठक झाली. परिचलन क्षेत्रामध्ये जी कामे करण्यात येणार आहेत, ती सर्व कामे रेल्वे मंत्रालयाकडून त्यांच्या निधीमधून करण्यात येणार आहे.

### मिरा भाईंदरमधून ३२७ कोटींचे अमली पदार्थ जप्त

**भाईंदर** : देशभरात अमली पदार्थांची निर्मिती करून विक्री करणाऱ्या एका मोठ्या टोळीचा पर्दाफाश करण्यास मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेला यश आले आहे. एकूण ३२७ कोटींचा साठा जप्त करून १५ जणांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. ही टोळी आंतरराष्ट्रीय दहशतवादी दाऊद इब्राहिमचा म्होरक्या सलीम डोळा चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

## पाऊले चालती पंढरीची वाट..!



(छाया : शंतनु नाफडे)

**सासवड** : विठ्ठलाच्या भेटीसाठी आतुर असलेल्या वारकऱ्यांचा मेळा मंगळवारी दिवेघाटात पोहचला. ज्ञानेश्वर माऊलींची पालखी दिवेघाट पार करून सासवडमध्ये दोन दिवस मुक्काम करणार आहे. जवळपास चार किमीच्या दिवेघाटात वारकऱ्यांनी 'माऊली, माऊली' असा गजर केला.

## रायगडातील ७३८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य परीक्षा परिषदेतर्फे १८ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक पाचवी व माध्यमिक आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये दोन्ही वर्गातील रायगड जिल्ह्यातील ७३८ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी अभिनंदन केले.

१८ फेब्रुवारी रोजी झालेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता आठवी) परीक्षेचा अंतरिम (तात्पुरता) निकाल ३० एप्रिल रोजी जाहीर करण्यात आला होता. ३० एप्रिल ते १० मे या कालावधीत गुण पडताळणीसाठीचे अर्ज संबंधित शाळेमार्फत ऑनलाईन मागविण्यात आले होते. या कालावधीत प्राप्त अर्ज निकाली काढून या परीक्षांचा अंतिम निकाल तयार करण्यात आला आहे. या अंतिम निकालावरून शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करण्यात आली आहे.

जिल्ह्यात पाचवीच्या वर्गातील १० हजार ३७९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी नोंदणी केली होती. यापैकी नऊ हजार ९६४ विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले. त्यापैकी अंतिम निकालानंतर ३७५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. आठवीच्या वर्गातील सात हजार ३३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी सात हजार २७ विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले होते. यामधील अंतिम निकालानंतर ३४२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत.

शिक्षण विभागाच्या वतीने शाळा स्तरावर विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घेण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्हा परिषदेसह खासगी शाळांमधील या परीक्षेत घवघवीत यश संपादित केले आहे.

### तालुकानिहाय विद्यार्थ्यांची संख्या

अलिबाग तालुक्यातील ६४ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून कर्जत ३०, खालापूर ३७, महाड १२५, माणगाव ७०, म्हसळा पाच, मुरुड आठ, पनवेल १९३, पेण ५०, पोलादपूर १७, रोहा ५९, सुधागड सात, श्रीवर्धन सात, तळा १२, उरण ५३ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत.

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी पूर्व उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी मारली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

पूर्व उच्च प्राथमिक म्हणजेच इयत्ता पाचवीच्या उज्ज्वल लहू चौगुले, संस्कृती जनार्दन भोपी, प्रथम विलास म्हात्रे, श्रेया राष्ट्रपाल प्रधान या चार विद्यार्थ्यांना तर माध्यमिक म्हणजेच इयत्ता आठवीच्या दक्ष निवृत्ती ठोंबरे, ओम दीपक वाघ, आर्यन साईनाथ पवार, यश रवींद्र मोरे, ईश्वरी उमेश खाडे, कस्तुरी संदीप पाटील, वेदिका नितीन भुयार या सात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेकरीता विद्यालयात विशेष मार्गदर्शन केले जाते. ज्यादा तासिका घेतल्या जातात, तसेच वेळोवळी सराव परीक्षा घेतल्या जातात. तज्ज्ञ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले, असे या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन केले जात आहे.

या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे आदी उपस्थित होते.



## हाथरसमधील घटनेचा मुख्यमंत्री योगींकडून आढावा

**हाथरस** : उत्तर प्रदेशातील हाथरस येथे मंगळवारी झालेल्या चेंगराचेंगरीत १२१ जणांचा मृत्यू झाला. याठिकाणी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी (दि.३) भेट घेत परिस्थितीचा आढावा घेतला.

या घटनेला जो कोणी जबाबदार असेल, त्याला कठोर शिक्षा केली जाईल, असे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले. भोले बाबांच्या सत्संगात त्यांना स्पर्श करण्याच्या शर्यतीत भक्तांमध्ये चेंगराचेंगरी झाली. केंद्र आणि राज्य सरकार मृत्यूमुखी पडलेल्यांना चार लाख रुपये आणि गंभीर जखमींना एक लाखांची मदत करणार आहे, असेही त्यांनी सांगितले.



# एजंटच्या नादी लागू नका!

## ‘लाडक्या बहिणीं’ना उपमुख्यमंत्री फडणवीसांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

लाडकी बहिण योजनेबाबत सर्व भगिनींना विनंती करतो की, एजंटच्या नादी लागू नका. कोणी एजंट येत असेल तर तक्रार करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी केले.



अमरावतीमध्ये एका सरकारी कर्मचाऱ्याने गडबड करण्याचा प्रयत्न केला. काल त्याला नोकरीतून काढून टाकले, सस्पेंड केले. त्याला बडतर्फ करण्याचा विचारही राज्य सरकार करत आहे. सेतू कार्यालय किंवा अंगणवाडी सेविकांना प्रतिफॉर्म ५० रुपये देण्याचा निर्णय राज्य सरकार घेणार आहे. यावर जर सेतू केंद्राने पैसे घेतले तर त्यांचं सेतू केंद्र रद्द करण्यात येईल. लाडकी बहिण योजना पारदर्शकपणे राबण्याचा आमचा हेतू आहे, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. ते विधानसभेत बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्य सरकारने अनेक चांगल्या योजनांची घोषणा केली आहे. माझी लाडकी बहिण ही अत्यंत महत्वकांक्षी योजना महाराष्ट्र सरकारने घोषित केली आहे. या योजनेमध्ये काल काही बदल करण्यात आले आहेत. २१ वर्षांपासून ६५ वर्षांपर्यंत ज्या महिलांचे उत्पन्न अडीच लाख रुपयांच्या आतमध्ये आहे. त्यांना १५०० रुपये महिन्याला देण्याचा निर्णय घेण्यात आलाय, असेही फडणवीस यांनी सांगितले.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, पाच एकर जमिनीबाबतची अट होती, ती आम्ही काढून टाकली आहे. शिवाय १५ दिवस नाही, तर अर्ज भरण्यासाठी ६० दिवसांची मुदत आपण दिली आहे. ६० दिवसांमध्ये जे अर्ज करतील, त्यांनी १ जुलैला अर्ज केलाय, असे समजून दोन्ही महिन्यांचे पेमेंट मिळेल. ऑगस्टनंतर जे अर्ज करतील त्यांना त्या दिनांकापासूनचे पेमेंट मिळेल, असा निर्णय घेण्यात आलाय.

डोमेसाईलचा दाखल्याचा प्रश्न निर्माण झाला होता, मात्र त्याला आम्ही नवऱ्याचा जन्म दाखला किंवा रेशनकार्ड असे पर्याय दिले आहेत. शिवाय मतदार यादीतील नाव असेल तरी तो डोमेसाईलला पर्याय असणार आहे. त्यामुळे आता रांगांमध्ये उभे राहण्याची गरज नाही, असा विश्वासही देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.


दरम्यान, जेवढे जास्तीत जास्त ऑनलाईन अर्ज करता येईल, तेवढे आपल्याला जलद गतीने काम करता येईल. त्यामुळे, महिला भगिनींनी ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केले आहे. तसेच, ऑनलाईनसाठी पोर्टलवर येणाऱ्या अडचणीही काढल्या जात आहेत, असेही त्यांनी सांगितले.

# मराठा आरक्षण देण्यासाठी शासनाचा सर्वोतोपरी प्रयत्न

## ■ मंत्री शंभूराज देसाईंची अधिवेशनात माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाजाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या शब्दांप्रमाणे कायद्यात टिकणारे आरक्षण देण्यासाठी राज्य शासन युध्दपातळीवर प्रयत्न करत असल्याचे उत्तर राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या वेळी दिले.



शासनाकडे आलेल्या सगेसोयरेच्या हरकतीबाबत सरकारचा निर्णय झाला का, ज्या मराठा समाजाच्या नोंदी सापडल्या नाहीत, त्यांना शपथपत्र देवून त्यांना प्रमाणपत्र द्यावे, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे, आरक्षण मिळेपर्यंत मराठा विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे, मराठा विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृह सुरू करणे याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

मंत्री श्री. देसाई म्हणाले की, शासनाने जात प्रमाणपत्र व नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र वितरण करण्याबाबत शासनाने जिल्हा पातळीवर १ लाख ३६ हजार ६९० दाखले वितरीत केले आहेत त्यापैकी २८ हजार १६५ दाखले वितरीत करणे प्रलंबित आहेत. उर्वरीत दाखले देखील लवकरच वितरीत करण्यात येतील. मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळावे अशी मागणी होती, त्या मागणीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करून मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी विशेष अधिवेशन बोलावले. त्यांनतर मराठा समाजाला १० टक्के स्वतंत्र आरक्षण देण्याचा कायदा केला. तो कायदा अंमलात आला पण त्याला काहीजणांनी न्यायालयात आव्हान दिले आहे. न्यायालयाने या कायद्याला स्थगिती दिलेली नाही.

मंत्री श्री. देसाई म्हणाले की, मराठा समाजाला न्याय मिळावा यासाठी सगेसोय-यांच्या बाबतीत आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे मसुदा तयार केला. याबाबत अधिसूचना प्रसिध्द केल्यानंतर आठ लाखांहून अधिक हरकती प्राप्त झाल्या असून त्यांची छाननी करण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित हरकतींवर देखील काम सुरू आहे. मराठवाड्यातील मुळ कागदपत्रे मिळावेत यासाठी हैदराबाद गर्व्हमेंटकडून अधिकृत प्रती मागविण्यात येणार आहेत. जिथे वसतिगृहासाठी जागा उपलब्ध आहेत तिथे प्रत्येक जिल्ह्यात मराठा विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्यासाठी बांधकाम सुरू आहे. मात्र, ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नाहीत तिथे भाडेतत्वावर इमारती घेण्यात येतील.

मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत जिल्हास्तरीय समिती आहे या समितीने १५७ गुन्हे मागे घेण्यासाठी शिफारस केली आहे. ३६ गुन्ह्यावर जिल्हास्तरीय समितीने शिफारस न केलेल्या गुन्ह्यांबाबत मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री व सर्वानुमते चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. तसेच मराठा आरक्षण विषयाच्या अनुषंगाने येणा-या प्रश्नासंदर्भात मंत्रीमंडळ उपसमिती निर्णय घेईल. या वेळी झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री कपिल पाटील, अमोल मिटकरी, जयंत पाटील यांनी सहभाग घेतला.

## निवडक

### मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

**पनवेल :** सूकापूर येथील माळेवाडी या परिसरातील एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र दुचाकीवरील चोरट्यांने खेचून चोरटा पसार झाला. या घटनेमुळे रस्त्यावर पायी चालणाऱ्या महिलांच्या सूरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला. याबाबत रितसर पिडीत महिलेने पोलिसांकडे तक्रार नोंदविली. कार्तिक्य अपार्टमेन्टमध्ये राहणाऱ्या ३४ वर्षीय महिला सोसायटीच्या प्रवेशव्दारावर पायी चालत असताना ३० ते ३५ वर्षांचा चोरटा दुचाकीवरून आला. त्याने या पिडीत महिलेसमोर दुचाकी आडवी लावून पिडीतेच्या गळ्यातील ६० हजार रुपयांचे मंगळसूत्र हिसकावून तेथून धूम ठोकली. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे.

### खालापूरात क्षुल्लक वादातून खून

**खालापूर :** मजुरी करिता गोंदिया येथून खालापूर येथे आलेल्या दोन कामगारांमध्ये झालेल्या क्षुल्लक वादातून हातोडा डोक्यात मारून ठार मारण्याची घटना खालापूरात घडली आहे. सचिन प्रभु नेवाळे (२८, रा. गोंदिया) आणि त्याचा नातेवाईक सतीश चैतराम भोंडे (गोदींया) इतर मजुरांसोबत खालापूर येथे मजुरीच्या कामासाठी आले होते. सोमवारी रात्री जेवण आणि मद्यपान झाल्यानंतर सतीश आणि सचिन या दोंघामध्ये भांडण झाले. सतीशने रागाचे भरात सचिनच्या डोक्यात हातोडा मारल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलिसांनी घटनास्थळावरून आरोपी सतीश याला ताब्यात घेत गुन्हा दाखल करत अटक केली आहे.

### कोमणादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये वृक्षलागवड

**उरण :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (एसएसईबी) उरण तर्फे कोमणादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये ४०० झाडाची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी एसएसईबी उरणतर्फे ४०० रोपाची लागवड कोमणादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये करण्यात आली. सर्व आधिकारी वर्ग, कामगाराचे सारडे विकास मंच तसेच कोमणादेवी ऑक्सिजन पार्क सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठान उरण तर्फे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.



# नवी मुंबईकरांच्या विविध प्रश्नांवर आमदार नाईक विधानसभेत आक्रमक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील जनतेला विविध नागरी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुविधा भूखंडाची आवश्यकता असून महापालिकेने विकास आराखड्यामध्ये आरक्षित केलेल्या भूखंडाची विक्री करण्याचा सपाटा सिडको महामंडळाने लावला असून त्याला स्थगिती द्यावी, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी बुधवारी (दि. ३) विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत केली. यासंबंधी त्यांनी मांडलेल्या लक्षवेधीवर उत्तर देताना उद्योग मंत्री उदय सामंत यांनी नवी मुंबई महापालिकेची स्वायत्तता अबाधित राखण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय घेईल, अशी ग्वाही दिली.

नवी मुंबई शहर वसविण्यासाठी सिडकोने येथील शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावात ५० नवीन पैसे प्रति स्क्वेअर मीटर विकत घेतल्या. परंतु या ठिकाणी मैदाने, बगीचे, रुग्णालये, शाळा अशा अनेक सोयी सुविधा पुरविल्या नाहीत. १९९५ मध्ये स्थानिक प्राधिकरण म्हणून नवी मुंबई महापालिकेची स्थापना झाली. मात्र ३० वर्षे पूर्ण होत आली तरी अद्याप महापालिकेचा शहरी विकास आराखडा मंजूर झालेला नाही. शासनाकडे तो अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित आहे. या विकास आराखड्यामध्ये जनतेच्या नागरी सोयी सुविधांसाठी महापालिकेने भूखंडांवर आरक्षणे टाकली आहेत मात्र हे भूखंड विकण्याचा सपाटा सिडको प्रशासनाने लावला आहे. एमआयडीसी प्रशासनानेदेखील महापालिकेला दिलेल्या सुविधा भूखंडाची विक्री केली आहे.

यासंदर्भात आमदार गणेश नाईक यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत १ जून २०२३ रोजी वरिष्ठ शासकीय स्तरावर बैठक झाली होती. या बैठकीमध्ये सिडको आणि एमआयडीसीकडून महापालिकेला देय असलेल्या भूखंडाची विक्री करू नये, ५०० चौरस फुटापर्यंतच्या निवासी घरांना मालमत्ता करामध्ये संपूर्ण सूट द्यावी, कंत्राटी कामगारांना कायम करावे, ऐरोली- काटई उन्नत पुलावर नवी मुंबईत काटई आणि मुंबई दोन्ही बाजूंनी चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी मार्गीका ठेवावी, बीएमटीसीच्या कर्मचाऱ्यांना भूखंड अदा करावेत, पाम बीच मार्ग पूर्ण करावा अशा एकूण वीस मागण्या आमदार नाईक यांनी केल्या होत्या.

### ■ मंत्री उदय सामंत यांच्याकडून उत्तर

*आमदार नाईक यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सविस्तर उत्तर दिले. नवी मुंबईमध्ये ११० स्क्वेअर किलोमीटर भूभागावर सिडकोचे नियंत्रण होते. महापालिकेच्या स्थापनेनंतर ४० स्क्वेअर किलोमीटरची जागा महापालिकेला देण्यात आली. या ४० स्क्वेअर किलोमीटर जागेवरील आणि सिडकोकडून महापालिकेला प्राप्त होणाऱ्या सुविधा भूखंडाची स्वायत्तता अबाधित ठेवण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.*

या बैठकीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगर विकास आणि सिडको महामंडळाच्या अधिकाऱ्यांना आदेश देत महापालिकेला देय सुविधा भूखंडांबाबत बैठक घेऊन निर्णय घ्यावा तोपर्यंत या सुविधा भूखंडांची विक्री करू नये असे आदेश देत भूखंड विक्रीला स्थगिती दिली होती. या बैठकीला एक वर्ष होऊन देखील याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही. आमदार नाईक यांनी याप्रकरणी शासनाबरोबर वर्षभर पत्रव्यवहार केला आहे, मात्र शासनातील आणि सिडकोमधील काही स्वार्थी अधिकारी मुख्यमंत्र्यांचे आदेश पाळत नसल्याचा संताप आमदार नाईक यांनी लक्षवेधीवर बोलताना व्यक्त केला. वीस लाख नवी मुंबईकर जनतेच्या जीवनाशी खेळू नका, असा इशारा त्यांनी काही स्वार्थी अधिकाऱ्यांना दिला.

# सुरक्षारक्षक, वॉर्डनला पावसाळी रेनकोटची प्रतीक्षा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रात काम करणाऱ्या सुरक्षारक्षक मंडळाच्या आणि वाहतूक नियमनासाठी नेमलेल्या सुरक्षा वॉर्डनला रेनकोट न मिळाल्याने भिजत किंवा हातामध्ये छत्री घेऊन कर्तव्य बजावताना जवान पनवेलमध्ये दिसत आहेत. याबाबत पनवेल महापालिकेच्या अधिकाऱ्यांना विचारले असता पावसाळी रेनकोट देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असल्याचे सांगण्यात आले.

महापालिका प्रशासन आणि जिल्हा सुरक्षा मंडळ, महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या असमन्वयामुळे १९१ जवानांना भीजत कर्तव्य बजावावे लागत आहे. पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये रायगड सूरक्षा मंडळाचे १६१ जवान सुरक्षा बजावत आहेत तसेच वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पनवेल महापालिकेने महाराष्ट्र सुरक्षा बलाकडून ३० जवानांना वाहतूक पोलिसांना मदतीसाठी नेमले आहे.

पनवेलमधील वाहतूक कोंडीचा प्रश्न जटील बनल्याने नवी मुंबई पोलिसांनी पनवेल महापालिकेकडे वॉर्डन नेमण्याची मागणी केली. पोलिसांच्या मागणीनंतर वाहतूक विभागाला ३० वार्डन महापालिकेने दिले. सध्या या वार्डनमुळे वाहतूक पोलिसांचा ताण कमी झाला आहे. वाहतूक कोंडी काही प्रमाणात सुटली आहे.

याबाबत पनवेल महापालिकेचे सुरक्षा विभागाचे सुरेश गांगरे यांना विचारले असता वॉर्डन किंवा सुरक्षा रक्षकांना पावसाळी रेनकोट देण्याची जबाबदारी संबंधित महामंडळाची असल्याचे स्पष्ट केले आहे.

# आदिवासी शाळांना संगणकाचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कुष्ठरोग निवारण समिती संचालित बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र, शांतिवनमध्ये रायगड जिल्हा परिषद पनवेल तालुक्यातील प्राथमिक शाळा कोंडप, गाढेश्वर व वाघाची वाडी अशा दुर्गम भागातील आदिवासी शाळेतून लायन्स क्लब ऑफ बॉम्बे होस्ट यांनी कोंडप या शाळेला तर साधु वासवानी मिशन यांनी गाढेश्वर व वाघाची वाडी अशा तीन शाळांना नुकतेच संगणक वाटप करण्यात आले.



लायन्स क्लब ऑफ बॉम्बे होस्टच्या अध्यक्षा जुबीन बिलीमोरया व लायन्स क्लब ऑफ बॉम्बे होस्टचे पदाधिकारी आणि साधु वासवानी मिशनचे रतन रोमा, साधु वासवानी मिशनचे पदाधिकारी यांच्या हस्ते तर कुष्ठरोग निवारण समितीच्या अध्यक्षा रक्षा मेहता, मणिभवन गांधी संग्रहालयच्या ट्रस्टी फाल्गुनी मेहता, कुष्ठरोग निवारण समितीचे प्रमुख कार्यवाह विनायक शिंदे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमासाठी कोडप, गाढेश्वर, वाघाची वाडी या शाळेचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. संगणक मिळाल्यानंतर शिक्षकांना व मुलांना आनंद झाला.

कुष्ठरोग निवारण समितीच्या अध्यक्षा म्हणाल्या, आज आपण बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र शांतिवनमध्ये रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना संगणक देणे या कार्यक्रमासाठी जमलो आहोत. हे संगणक तुम्हाला लायन्स क्लब ऑफ बॉम्बे (होस्ट) आणि साधु वासवानी मिशन यांनी दिले आहेत. त्याचे मी शतशः आभारी आहे. यापूर्वी रा.जि.प. १२ प्राथमिक शाळेतून स्टील कपाट, सिंग फॅन, टेबल फॅन, इ. भौतिक सुविधांचा संच दिला आहे. हे सर्व लायन्स क्लब ऑफ बॉम्बे (होस्ट), शार्दुल मेहता, तुषा पटेल, तनुज पटेल यांनी गांधी स्मारक निधी, मुंबई व मणिभवन गांधी संग्रहालयच्या मार्फत दिले होते.

हे संगणक देणगीस्वरुपात मिळविण्यासाठी फाल्गुनी मेहता यांनी अथक प्रयत्न केले तर कार्यक्रमाचे नियोजन बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्राचे समन्वयक संजय गुळुंबकर यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सेंटरच्या प्रतिक्षा जाधव केले तर आभार कुष्ठरोग निवारण समितीचे प्रमुख कार्यवाह विनायक शिंदे यांनी मानले.

# मुंबई-वर्सोवा ते पंढरपूर पायी वारीचे पनवेलमध्ये स्वागत

## शनी मंदिरात वारकऱ्यांना महाप्रसादाचे आयोजन



**पनवेल : वार्ताहर**

मुंबईहून पंढरपूरला निघालेल्या मुंबईच्या वर्सोवातील हरी विजय वारकरी मंडळ वारीचे पनवेलमध्ये स्वागत करण्यात आले. टपाल नाका येथील शनी मंदिरात श्री गणेश मित्र मंडळ मंडळाचे अध्यक्ष सुनील खळदे यांनी आपल्या सहकार्यांसह वारी आणि वारकऱ्यांचे स्वागत केले व वारकऱ्यांना महाप्रसादाचे आयोजन केले.

वर्सोवा गावातील अनेक भजनी मंडळी ही गेली अनेक वर्षे पंढरपूर वारी करत आहेत. तीच परंपरा आम्ही पुढे चालू ठेवली असल्याचे हरिविजय वारकरी मंडळाचे अध्यक्ष नितीन द्वारकानाथ भाटे यांनी सांगितले. या वारीत हरिविजय वारकरी मंडळाचे सेक्रेटरी मंगेश चंद्रकांत चिखले, खजिनदार व वारीचे बुवा श्री प्रल्हाद द्वारकानाथ पिकले यांच्यासह अनेक वारकरी सहभागी झाले आहेत. पनवेल येथे झालेले स्वागत व महाप्रसादाने वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# नवी मुंबईतील पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

**पनवेल : वार्ताहर**

राज्यातील पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या झालेल्या बदल्यांमध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात कार्यकाळ पूर्ण झालेल्या आठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या इतरत्र करण्यात आल्या आहेत. तर नव्याने १७ पोलीस निरीक्षक नवी मुंबईत दाखल होणार आहेत.

बदली झालेल्या अधिकाऱ्यांना संबंधित घटक प्रमुखांनी त्यांच्या बदलीवर येणाऱ्या अधिकार्यांची वाट न पाहता त्यांना तत्काळ कार्यमुक्त करण्याचे सूचित केले आहे. तसेच जे पोलीस अधिकारी बदली झालेल्या ठिकाणी कार्यमुक्त करूनदेखील वेळेत बदलीवर हजर होणार नाहीत, अशा पोलीस अधिकाऱ्यांविरोधात घटकप्रमुखांनी शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्याचे आदेशदेखील दिले आहेत.


‘पोलीस आस्थापना मंडळ’तर्फे प्रत्येक आयुक्तालयात सहा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या पोलीस निरीक्षकांच्या बदलीचे आदेश ३० जून रोजी काढण्यात आले आहेत. या बदली आदेशानुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील आठ पोलीस निरीक्षकांची मुंबई शहरात बदली करण्यात आली आहे. यात विश्वनाथ कोळेकर, भागुजी औटी, रवींद्र पाटील, मधुकर भटे, बासितअली सय्यद, राजीव शेजवळ, सुहास चव्हाण आणि अतुल आहेर यांचा समावेश आहे. तर बदलीमुळे नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयात रिक्त होणाऱ्या जागी राज्यातील इतर भागातून बदली झालेले १७ नवे अधिकारी दाखल होणार आहेत.

बाळकृष्ण सावंत (पिंपरी-चिंचवड), देवेंद्र पोळ (रायगड), दीपक सुर्वे (मुंबई शहर), नंदवुमार कदम (नाशिक ग्रामीण), संदीप ानिगडे (मुंबई शहर), दिपक चव्हाण (मुंबई शहर), अर्जुन रजाने (मुंबई शहर), संजय धुमाळ (राज्य पोलीस नियंत्रण कक्ष मुंबई), विकास ाघोडके (ठाणे शहर), स्मिता ढाकणे (लोहमार्ग, मुंबई), किशोर साळवी (मुंबई शहर), भास्कर कोकरे (मुंबई शहर), अश्विनी पाटील (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग), अतुल दहिफळे (विशेष सुरक्षा विभाग), राहुल काटवानी (विशेष सुरक्षा विभाग), देवीदास कठाळे (गोंदिया) आणि मिलिंद हिवाळे-(रायगड) यांची नवी मुंबईत बदली करण्यात आली आहे.

## दुखवटा


### आद्य नाईक

**अलिबाग :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अलिबाग-मुरूड विधानसभा मतदासंघाचे अध्यक्ष अमित नाईक आणि सारळ ग्रामपंचायतीच्या सरपंच अमृता अमित नाईक यांचा पुत्र आद्य नाईक (वय १८) याचे अल्पशा आजाराने सोमवारी निधन झाले. आद्य नाईक मागील वर्षी तो बारावीची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला होता. त्यानंतर पुढील शिक्षण ही घेत होता. त्यांच्या निधनाने नाईक कुटुंबासह सारळ-म्हात्रोळी गावाला धक्का देणारे होते.



### आनंदीबाई भोईर

**मोहोपाडा :** चौक कोपरी येथील हभप आनंदीबाई मोतीराम भोईर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कोपरी येथील स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रीया विधी ८ जुलै रोजी श्री क्षेत्र रामेश्वर येथे होणार असून उत्तरकार्य ११ जुलै रोजी कोपरी येथील राहत्या घरी होणार आहेत. उत्तरकार्यानिमित्त हभप रायगड भूषण रामदास महाराज पाटील यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



# अनधिकृत पार्किंगवर वाहतूक पोलिसांची धडक कारवाई





**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण–पनवेल महामार्गावरील उरण, दास्तानफाटा, चिर्ले, धुतुम व जासई येथील शंकर मंदिर परिसरात उरण वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या पथकाने रस्त्यावर बेकायदेशीरपणे उभ्या असलेल्या अवजड ट्रेलर पार्किंगला आळा घालण्यासाठी या अवजड वाहनांवर दंडात्मक कारवाईचा धडाका लावला आहे.

मागील सहा महिन्यांच्या कालावधीत उरण वाहतूक पोलिसांनी सात हजार ३८९ अवजड वाहनांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. त्याचप्रमाणे महामार्गांवर अवजड वाहने पार्किंग न करण्याचे आवाहनही अवजड चालक मालकांना करण्यात आले आहे. तर न्हावाशेवा वाहतूक पोलिसांच्या हद्दीत रोडवर बेकायदेशीर पार्किंग होणाऱ्या वाहनांवर वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम.मुजावर यांच्या वाहतूक पोलिसांनी धडक कारवाई सुरु केली असून, ट्रान्सपोर्ट चालक व मालक यांनी आपली वाहने रस्त्यावर उभी न करता सदरील वाहने जेएनपीएने बनविलेल्या पार्किंगमध्ये उभी करावी, असे आवाहन मुजावर यांनी केले आहे. तसेच या पुढे कोणीही अवजड वाहने रस्त्यावर उभी करून ठेवल्यास या वाहनांवर कायदेशीर दांडात्मक कारवाई केली जाईल, असे बजावले आहे.

जेएनपीए ते पनवेल दरम्यान सहा ते आठ पदरी महामार्ग मागील दोन वर्षांपासून साकारण्यात आले आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी झाले आहे, मात्र महामार्गांवर बेकायदेशीरपणे उभ्या असलेल्या अवजड कंटेनर ट्रेलर पार्किंगमुळे महामार्गांवरील चालणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होत असल्याने अपघात घडत आहेत. नवी मुंबई पोलीस वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी अपघात टाळण्यासाठी महामार्गांवरील अवजड कंटेनर ट्रेलर पार्किंगला आळा घालण्यासाठी कारवाईचे निर्देश दिल्याने उरण व न्हावाशेवा वाहतूक पोलिसांनी महामार्गांवरील पार्किंग लगाम घालण्यासाठी कंबर कसली आहे.

### उरण तालुक्यात अनेक अपघात

**उरण तालुक्यात अनधिकृत पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणात उग्ररूप धारण केली आहे. अनधिकृत पार्किंगमुळे दरवर्षी उरण तालुक्यात अनेकांचे बळी जात आहेत. विविध अपघात व अनधिकृत पार्किंगमुळे आजपर्यंत ८०० हुन जास्त व्यक्तींचा मृत्यू उरणमध्ये झाला आहे. त्यामुळे या पार्श्वभूमीवर उरण परिसर व मुख्यत्वे करून शंकर मंदिर जासई, हायवे मार्गावर ट्रॅफिक पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अनधिकृतपणे असलेल्या वाहनांवर कारवाई केली.**

**चालक व मालकांनी आपली वाहने कोठेही पार्क करू नये. वाहतूकीच्या नियमांचे पालन करावे. येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना त्रास होईल असे वर्तन कोणीही करू नये. जो कोणी अनधिकृत पार्कींग करेल त्या वाहन चालक व मालकावर कारवाई करण्यात येईल.**

**–वैशाली गलांडे,**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**

# पनवेल क्षेत्रात विशेष स्वच्छता अभियान

## ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’ अंतर्गत उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात १ जुलै ते ३१ ऑगस्ट दरम्यान स्वच्छ भारत मिशन अर्बन २.० अंतर्गत ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’ अभियान राबविण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसांमध्ये चारही प्रभाग समितीमध्ये विशेष स्वच्छता मोहिमांचे आयोजन करण्यात आले.



केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार ‘सफाई आपनाओ, बिमारी भगाओ’ अभियानांतर्गत पहिल्या आठवड्यामध्ये विशेष स्वच्छता मोहिम आयोजित करण्याविषयी सूचित करण्यात आले होते. त्यानूसार उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार प्रभाग समिती ब अंतर्गत रोडपाली येथे जय महाराष्ट्र रिक्षा नाका व बस स्टॉप येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये प्रभाग क्रमांक ७ चे स्वच्छता दुत जय महाराष्ट्र रिक्षा नाकाचे सर्व रिक्षावाले तसेच ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग नोंदविला.

प्रभाग समिती ड पनवेल विभागामध्ये पनवेल बस स्थानक येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पनवेल रेल्वे स्टेशन, व प्रभाग समिती ‘अ’ मध्ये खारघर रेल्वे स्टेशन व एनएमएमटी बस पार्किंग खांदा कॉलनीत या अभियानांतर्गत विशेष स्वच्छता मोहीम घेण्यात आली.

या अभियानांतर्गत कळंबोली येथील मनसे मैदान परिसर येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मोहीम अंतर्गत प्रभाग क्र १६ चे स्वच्छता दूत व जेट मशीनच्या सहाय्याने मनसे मैदान शेजारील सेक्टर–३ नवीन पनवेल शौचालय आतील व शौचालय परिसर साफ सफाई करण्यात आली. या ठिकाणी प्रभाग समिती क कामोठे विभागामध्ये प्रभाग क्रमांक १२ येथील स्वच्छता दुत यांच्यामार्फत खांदेश्वर स्टेशन (ट्रांन्सपोर्ट हब) स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या विशेष स्वच्छता अभियानामध्ये घनकचरा व स्वच्छता विभागाचे विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, शौचालय अधीक्षक भावेश चंदने, चारही प्रभागातील सर्व स्वच्छता निरीक्षक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यापुढेही सातत्याने स्वच्छता मोहिमेचे काम सुरूच राहणार आहे तसेच या अभियानांतर्गत यापुढेही आठवडा निहाय विविध उपक्रम घेण्यात येणार आहे.

# खारघरमध्ये होर्डिंग कोसळून नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

घाटकोपर येथे भलेमोठे होर्डिंग कोसळून १६ जणांचा मृत्यू घडल्याची घटना ताजी असतानाच खारघर, सेक्टर–३४ आमनदूत मेट्रो स्टेशनसमोर सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जाहिरात फलक कोसळण्याची घटना घडली आहे.

या वेळी या ठिकाणाहून जाणाऱ्या दोन पादचारी महिला थोडक्यात बचावल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. या घटनेत परिसरात उभ्या असलेल्या एका बैलगाडीचे आणि रस्त्यावरून जाणाऱ्या टेम्पोचे नुकसान झाले आहे. खारघर, सेक्टर–३४ येथे होर्डिंग कोसळल्याने कोणतीही



जीवितहानी झालेली नाही. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होऊन तत्काळ दुर्घटनाग्रस्त होर्डिंग हटवले, परंतु या घटनेने घाटकोपर येथे काही दिवसांपूर्वी घडलेल्या घटनेची आठवण करून दिली.

पनवेल महापालिका क्षेत्रातदेखील मोठ्या प्रमाणात होर्डिंग लावलेल्या दिसतात. त्यामध्ये अनेक अनधिकृत होर्डिंग असून ज्याने भविष्यात मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे महापालिकेने तत्काळ असे होर्डिंग हटवून भविष्यात होणारी दुर्घटना टाळावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जाते.

खारघरमधील पापडीचा पाडा गावाजवळ असलेल्या चौकी शेजारच्या रस्त्यालगतचे होर्डिंग कोसळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# प्रेयसीच्या आत्महत्येप्रकरणी प्रियकर अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

नाशिक येथे राहणाऱ्या तरुणाने, पनवेल येथील २७ वर्षीय तरुणीसोबत नऊ वर्षे प्रेमसंबंध आणि वेळोवेळी तिच्यासोबत शारीरिक संबध ठेवत अचानकपणे तिच्याशी लग्न करण्यास नकार दिल्याने मानसिक तणावाखाली आलेल्या या तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

या घटनेनंतर पनवेल शहर पोलिसांनी आरोपी तरुण विजय प्रकाश गोरे (वय २८) याच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील मृत तरुणी पनवेल येथे तर आरोपी प्रियकर विजय गोरे नाशिक ओझर येथे राहण्यास आहे. २०१६मध्ये या दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरू झाले होते. यादरम्यान विजय गोरे याने तरुणीसोबत अनेक वेळा शरीरसंबंध प्रस्थापित केले होते. त्यानंतर २०२० मध्ये दोघेही लग्न करणार असल्याचे तरुणीने आपल्या आई–वडिलांना सांगितले होते. या दोघांच्या लग्नास तरुणीच्या आई–वडिलांनीही होकार दिला होता. गेल्या नऊ वर्षांपासून या दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरू होते. त्यानंतर मे महिन्यामध्ये विजयने त्याच्या आई–वडिलांचा त्यांच्या लग्नास विरोध असल्याचे तसेच त्यांनी दुसऱ्या मुलीसोबत त्याचे लग्न करण्याची तयारी सुरू केल्याचे प्रेयसीला सांगून लग्नास नकार दिला होता.

यानंतर तरुणीने आपल्या बहिणींसह नाशिक येथे जाऊन विजय गोरे याची भेट घेऊन त्याला लग्न न करण्यामागचे कारण विचारले होते. त्यावेळी विजय गोरे याने वेगवेगळी कारणे सांगून तिच्यासोबत लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला होता. त्यानंतर या तरुणीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी विजय गोरे याला चौकशीसाठी बोलावून घेतले होते, मात्र तो पोलीस ठाण्यातसुध्दा हजर झाला नाही. त्यानंतर खचलेल्या या तरुणीने कामावर जाणेसुध्दा बंद केल्याने ती मानसिक तणावाखाली आली होती. याच मानसिक तणावातून या तरुणीने २३ जून रोजी दुपारी घरामध्ये कुणीही नसताना बेडरुममध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली.

या वेळी तरुणीने आत्महत्येपूर्वी आपल्या दोन बहिणींसाठी तसेच विजय गोरे याच्यासाठी अशा तीन चिठ्ठ्या लिहून ठेवल्याचे आढळून आले. विजय गोरे याच्यासाठी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये तरुणीने अनेक गोष्टी लिहून ठेवल्याचे आढळून आले. यावरून विजय गोरे याने दिलेल्या मानसिक त्रासामुळे तरुणीने आत्महत्या केल्याचे आढळून आल्यानंतर तिच्या कुटुंबीयांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात विजय गोरे याच्या विरोधात तक्रार दाखल केली.

या तक्रारीच्या आधारे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अंकुर शेलार व पो.हवा.परेश म्हात्रे यांनी गुप्तबातमीदाराद्वारे व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध घेवून त्याला ताब्यात घेतले आहे. व पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# ‘सीकेटी’च्या ‘मास्टरमाईंड’ विद्यार्थ्यांचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना मास्टरमाईंड परीक्षेत राष्ट्रीय पातळीवर घवघवीत यश मिळाले आहे. त्याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्याविद्यार्यांचे अभिनंदन केले आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सी.के.टी विद्यालयातील दिनिशा नेरूरकर या तिसरीच्या विद्यार्थीनीने इंग्लिश मास्टरमाईंड ह्या संस्थेने मुंबई येथे आयोजित जी.के. परीक्षेत राज्यात दुसरा क्रमांक पटकावला तसेच सिनिअर के. जी. गौरीक



भिलारे ह्या विद्यार्थ्याने इंग्लिश विषयात राज्यात आठवा क्रमांक पटकावून सी के टी विद्यालयाच्या नावलौकिकात भर पाडली. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे उपस्थित होत्या.

# पनवेलच्या शहर अभियंतापदी संजय कटेकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पनवेल महापालिकेच्या शहर अभियंतापदी संजय कटेकर यांची नियुक्ती करण्यात आली. १ जुलै रोजी कटेकर यांनी नव्या पदाची सूत्रे हाती घेतली. राज्य सरकारने त्यांना दोन महिन्यांपूर्वी कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती दिली होती.

नगर परिषद काळात रोजंदारीवर कनिष्ठ अभियंता म्हणून रुजू झालेले संजय कटेकर पनवेल नगरपालिकेतील सर्वांत वरिष्ठ सिव्हिल इंजिनीअर आहेत. नगर परिषद काळात त्यांच्या काळात अनेक प्रकल्प त्यांनी मार्गी लावले. शहरातील प्रत्येक बांधकाम विभागाच्या प्रकल्पाची माहिती असलेले इंजिनीअर म्हणून कटेकर यांची ओळख आहे. महापालिकेच्या स्थापनेनंतर त्यांना प्रकल्प अभियंतापद देऊन प्रशासनाने त्यांच्या अनुभवाचा मान राखला. ३० जून रोजी शहर अभियंतापद रिक्त झाल्यानंतर ठरल्याप्रमाणे संजय कटेकर यांची नियुक्ती शहर अभियंतापदावर करण्यात आली.

महत्त्वाच्या पदावर नियुक्ती झालेले कटेकर हे नगर परिषद काळातील पहिले अधिकारी ठरले आहेत. कटेकर हे पनवेल तालुक्यातील बंबईपाडा गावातील मूळचे रहिवासी आहेत. कटेकर यांच्या नियुक्तीनंतर अनेकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



**पनवेल : संजय कटेकर यांच्या शहर अभियंतापदी झालेल्या नियुक्तीबद्दल त्यांचे महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन केले. या वेळी माजी नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, विजय चिपळेकर, विकास घरत, माजी नगरसेविका रूचिता लोंढे तसेच प्रदीप भगत, भाऊ भगत, रवी गोवारी उपस्थित होते.**

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय वह्या वाटप कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी वेळेला महत्व देऊन आपले आभ्यास करावा, असा सल्ला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी वह्या वाटपाच्या कार्यक्रमावेळी देत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने गेल्या २८ वर्षांपासून न थांबता सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाची मदत केली जात असून त्याचा फायदा हजारो विद्यार्थ्यांनी घेतला आहे. त्यामुळे आपणसुद्धा या वह्यांच्या माध्यमातून चांगला अभ्यास करून आपण आपले शिक्षण चांगल्या पद्धतीने घ्यावे, असे प्रतिपादन केले.



श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यांदाही वह्या वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याअंतर्गत उलवे नोडमधील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयातील मराठी माध्यम मधील विद्यार्थ्यांसाठी वह्या वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी (दि. ३) करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, वसंतशेठ पाटील, विठ्ठलशेठ ओवळेकर, जयवंत देशमुख, प्रवीण ठाकूर, दीपक गोंधळी, विश्वनाथ कोळी, भाजपचे तालुका चिटणीस एम. डी. खारकर, उलवेनोड नोड भाजप अध्यक्ष निलेश खारकर, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य परशुराम कुंभार, रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, निकीता खारकर, सुधाकर पाटील, मच्छिंद्र कोळी, स्वप्निल म्हात्रे, नंदकुमार ठाकूर, दीपक जामकर, गीताताई ठाकूर, स्नेहा कुंभार, दिलीप कोळी, महेश सोमासे, रोहिदास खारकर, गणेश सोमासे, अनिल कुंभार, शैलेश भगत, धीरज ओवळेकर, महिला मोर्चाच्या प्रिया शिंदे, रामनाथ कोळी निखिल कुंभार, राजेश खारकर, किसन खारकर, विकी खारकर, प्रणय कोळी, समीर मढवी, अनिकेत मढवी, प्रदीप डोलकर, प्रसाद डोलकर, सीबीएससी बोर्डाच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक डी. जी. हजारे आदी उपस्थित होते.

# पावसाची हुलकावणी; उकाड्यात वाढ

**पनवेल :** शहरामध्ये मागील आठवड्यात पावसाने चांगला जोर धरला होता. सकाळ, दुपार आणि रात्रीही चांगल्या प्रमाणात पडला, मात्र या आठवड्यात सोमवारपासून पावसाने काहीशी विश्रांती घेतल्याचे चित्र दिसले. सकाळी काही सरींनंतर दुपारी व सायंकाळी त्याने विश्रांती घेतल्याचे चित्र पहावयास मिळाले. यंदा जुलै महिना उजाडला तरी अपेक्षित असा पाऊस पडत नाहीये. पावसाने दिलेल्या या हुलकावणीमुळे उकाडा वाढला आहे. तुरळक सरींनंतर मोठ्या प्रमाणात उष्णता वाढत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील छत्रपती शिवाजी विद्यालय आणि जनार्दन आत्माराम भगत ज्युनियर कॉलेजमधील क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर हे सेवानिवृत्त झाले आहेत. यानिमित्त ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जयराम ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# गर्दीचे नियोजन नीट व्हावे

उत्तर प्रदेशातील हाथरस जिल्ह्यात सत्संगाच्या एका कार्यक्रमात मंगळवारी चेंगराचेंगरी होऊन १२१ जण मृत्यूमुखी पडले. यात महिला व मुलांची संख्या मोठी आहे. देशात गेल्या वीसएक वर्षांत अशा तऱ्हेच्या चेंगराचेंगरीच्या अनेक घटना घडलेल्या असल्याने यापुढे अशा दुर्दैवी घटना टाळण्यासाठी गर्दीच्या ठिकाणी जमावाच्या नियंत्रण आणि नियोजनाबाबत ठोस व कठोर नियमावली ठरवण्याची गरज आहे.

**उत्तर प्रदेशच्या हाथरस जिल्ह्यातील पुलराई गावात भोलेबाबा यांच्या सत्संगाचेवेळी चेंगराचेंगरी होऊन ११६ भाविकांचा मृत्यू झाला आणि शेकडो भाविक जखमी झाले. मृतांमध्ये महिला आणि मुलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. सत्संगाचा कार्यक्रम संपल्यानंतर भोलेबाबांची 'चरणधूल' घेण्यासाठी गर्दी उसळल्याने वाटेत बसलेल्या महिला व मुलांचा चेंगराचेंगरीत बळी गेल्याचे प्राथमिक माहितीत समोर आले आहे. कार्यक्रमस्थळी ८० हजार लोकांच्या उपस्थितीसाठी परवानगी घेण्यात आली होती, परंतु प्रत्यक्षात घटनास्थळी अडीच लाख लोक जमा झाले असे सांगितले जाते. भोलेबाबा घटनास्थळावरून निघून जात असताना त्यांच्या सेवकांनी जमावाला रोखून धरले, पण ते जाताच त्यांच्या पायांची धूळ कपाळी लावण्यासाठी गर्दी उसळली. त्यामुळे अनेक लोक गुदमरले तर काही नजीकच्या नाल्यात पडले असे समजते. घटनास्थळीचे दृश्य इतके विदारक होते की तेथे पुढील कार्यवाहीसाठी पोहोचलेल्या एका तीस वर्षीय पोलिसाचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. मृतांची संख्या वाढण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. याप्रकरणी आयोजकांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला असून प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आश्वासन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिले आहे. मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दोन लाख रूपये व जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणाही करण्यात आली आहे. संबंधित भोलेबाबा यांचे मूळ नाव सूरज पाल सिंह असे असून १७ वर्षांपूर्वी पोलीस कॉन्स्टेबलची नोकरी सोडून त्यांनी सत्संग सुरू केला व नाव बदलून साकार हरि असे नाव धारण केले. परंतु लोक प्रेमाने त्यांना भोलेबाबा असे संबोधतात. पांढरा सूटबूट परिधान करणारे भोलेबाबा मानवसेवेचा संदेश देतात. कासगंज जिल्ह्यात बहादुरनगर येथे त्यांचा आश्रम आहे. उत्तर प्रदेशखेरीज राजस्थान, मध्य प्रदेश येथूनही त्यांच्या सत्संगासाठी लोक येतात. आध्यात्मिक सत्संगाच्या ठिकाणी क्षमतेपेक्षा जास्त गर्दी होणे, तेथे भाविकांसाठी पिण्याचे पाणी वा सुरक्षिततेच्या उपाययोजना नसणे हे आपल्याकडे अनेकदा घडले आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षांत चेंगराचेंगरीच्या दुर्दैवी घटनाही अनेक घडल्या आहेत. आयोजक बहुतेकदा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी व कार्यक्रमादरम्यान गर्दीचे शिस्तीत नियोजन करतात. परंतु गर्दीतील लोकांनी सुरक्षित बाहेर पडावे ही आयोजकांना आपली जबाबदारी वाटत नाही का? गर्दी बाहेर पडण्याची नियोजनपूर्वक आखणी करून दुर्घटना टाळता येऊ शकते. हाथरस येथे दुर्घटना घडल्यानंतर स्थानिक प्रशासनावर लोकांनी ठपका ठेवला आहे, परंतु प्रत्यक्षात घटनास्थळी स्वयंसेवकांनी पोलिसांना प्रवेश नाकारला होता असेही सांगितले जाते. अशातऱ्हेच्या आकस्मिक चेंगराचेंगरीच्या घटना निव्वळ धार्मिक स्थळीच घडतात असेही नव्हे. आपल्याकडे रेल्वेस्टेशन परिसरातही अशी घटना घडल्याची नोंद आहे. एखाद्या ठिकाणाहून बाहेर पडण्यासाठी जमावाने गोंधळ माजवल्यास अशी घटना घडते. लोकांनी सबुरीने एकमेकांना सांभाळत हालचाल केल्यास दुर्घटना टाळता येऊ शकते, परंतु जागा अपुरी व जमाव मोठा असल्यास दुर्दैवाने कुणाचेच परिस्थितीवर नियंत्रण राहात नाही.**

# तरुणांचे मार्गदर्शक स्वामी विवेकानंद

तरुणांना नेहमीच प्रेरणा देणारे स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी झाला. जागतिक स्तरावर भारताचा सन्मान राखण्यासाठी स्वामी विवेकानंदांची अनेक उदाहरणे इतिहासात आढळतात. ते नेहमी स्वतःला गरिबांचे सेवक संबोधत. देशदेशांत भारताचा अभिमान उजळण्याचा त्यांनी नेहमीच प्रयत्न केला. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्याचा हा प्रयत्न...

स्वामीजींच्या घरचे नाव नरेंद्र दत्त होते. नरेंद्र यांची बुद्धी लहानपणापासूनच तीक्ष्ण होती आणि ईश्वरप्राप्तीची तळमळही प्रबळ होती. त्यासाठी ते प्रथम ब्राह्मसमाजात गेले पण तेथे त्यांचे मन तृप्त झाले नाही. त्यांचे वडील विश्वनाथ दत्त यांचा पाश्चात्य संस्कृतीवर विश्वास होता. त्यांच्या मुलाला अर्थातच नरेंद्र यांनाही इंग्रजी शिकवून ते पाश्चात्य सभ्यतेच्या पद्धतीवर चालवायचे होते. १८८४मध्ये विश्वनाथ दत्त यांचे निधन झाले. त्यामुळे घराचा भार नरेंद्र यांच्यावर पडला. घरची परिस्थिती बेताची होती. नरेंद्र यांचे लग्न झाले नव्हते. अत्यंत गरिबीतही नरेंद्र पाहुण्यांची सेवा करत असे. ते स्वतः भूक लागल्यावर पाहुण्याला जेवण द्यायचे, रात्रभर बाहेर पावसात भिजत पाहुण्याला त्याच्या पलंगावर झोपवायचे.

एकदा विवेकानंद भारतातील महान संत रामकृष्ण परमहंस यांच्याकडे त्यांच्याशी तर्क करण्याच्या विचाराने गेले होते, परंतु परमहंस यांनी पाहून ओळखले की, हा तोच शिष्य आहे ज्यांची ते अनेक दिवस वाट पाहत होते. परमहंसजींच्या कृपेने त्यांना आत्मसाक्षात्कार झाला, परिणामी नरेंद्र परमहंसजींच्या शिष्यांमध्ये प्रमुख झाले. निवृत्त झाल्यावर त्यांचे नाव विवेकानंद ठेवण्यात आले.

स्वामी विवेकानंदांनी आपले जीवन गुरुदेव स्वामी रामकृष्ण परमहंस यांना समर्पित केले होते. गुरुदेवांच्या मृत्यूच्या दिवसात, त्यांच्या घरची आणि कुटुंबाची



बिकट परिस्थिती, स्वतःच्या अन्नाची पर्वा न करता, गुरू सेवेत सदैव हजर होते. गुरुदेव खूप आजारी झाले होते. कर्करोगामुळे थुंकी, रक्त, कफ आदी घशातून बाहेर पडत होते. हे सर्व ते अतिशय काळजीपूर्वक साफ करीत असे.

एकदा कोणीतरी स्वामी रामकृष्ण परमहंस म्हणजेच गुरुदेवांच्या सेवेत द्वेष आणि निष्काळजीपणा दाखवला आणि द्वेषाने नाक मुरडले. ते पाहून विवेकानंद संतापले. त्या गुरुभाईंना धडा शिकवताना आणि गुरुदेवांचे प्रत्येक गोष्टीवर प्रेम असल्याचे दाखवत त्यांनी त्यांच्या पलंगाच्या जवळ रक्त, कफ आदींनी भरलेले थुंकी उचलले आणि ते पूर्ण प्याले.

गुरूंवरील अशा अनन्य भक्ती आणि निष्ठेच्या प्रतापानेच ते आपल्या गुरूंच्या शरीराची आणि त्यांच्या दैवी आदर्शांची उत्तम सेवा करू शकले. ते गुरुदेवांना समजून घेऊ शकले, स्वतःचे अस्तित्व गुरुदेवांच्या रूपात विलीन करू शकले. भारताच्या अमूल्य आध्यात्मिक खजिन्याचा सुगंध जगभर पसरवण्यासाठी. गुरुभक्ती, गुरुसेवा आणि गुरूंवरील अखंड निष्ठा ही त्यांच्या या महान व्यक्तिमत्त्वाचा पाया होता. यात्रा- नरेंद्र दत्त यांनी वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी भगवा कपडे परिधान केले होते. त्यानंतर त्यांनी भारतभर पायी प्रवास केला. १८९३मध्ये शिकागो (यूएसए) येथे जागतिक धर्म परिषद भरत होती. स्वामी विवेकानंद भारताचे प्रतिनिधी म्हणून तेथे पोहोचले. युरोप-अमेरिकेतील लोक त्या काळातील लोकांकडे अत्यंत हीन नजरेने पाहत. तिथे लोकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंदांना सर्व धर्म परिषदेत बोलायला संधी मिळू नये.

एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना थोडा वेळ मिळाला, पण त्यांचे विचार ऐकून सर्व अभ्यासक थक्क झाले. त्यानंतर अमेरिकेत त्यांचे जोरदार स्वागत झाले. त्यांच्या भक्तांचा मोठा समुदाय होता. ते अमेरिकेत तीन वर्षे वास्तव्य करून तिथल्या लोकांना भारतीय तत्त्वज्ञानाचा अद्भुत प्रकाश देत राहिले. अध्यात्म आणि भारतीय तत्त्वज्ञानाशिवाय जग अनाथ होईल हा स्वामी विवेकानंदांचा ठाम विश्वास होता. अमेरिकेत त्यांनी रामकृष्ण मिशनच्या अनेक शाखा स्थापन केल्या. अनेक अमेरिकन विद्वानांनी त्यांचे शिष्यत्व घेतले.

स्वामी विवेकानंद यांचा मृत्यू ४ जुलै १९०२ रोजी झाला. सध्या भारतातील तरुण ज्या महापुरुषांना आदर्श मानतात त्यांच्या विचारांनी प्रेरित आहेत, ते तरुणांचे मार्गदर्शक आहेत आणि स्वामी विवेकानंद यांचा भारतीय गौरव आहे.

**-साभार वेबदुनिया**

# आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी!

सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे वारकऱ्यांच्या आरोग्यसेवेसाठी आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी उपक्रम राबविण्यात येत असून त्याचा पुणे विभागीय शुभारंभ राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते नुकताच विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आला. या उपक्रमासाठी आरोग्य विभागाने जय्यत तयारी केली आहे.

आरोग्य वारीच्या माध्यमातून वारकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती देऊन आरोग्य कीटचे वाटपही करण्यात आले. यानंतर त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखीचे दर्शन



घेऊन वारकऱ्यांना आरोग्य कीटचे वाटप केले गेले आहे.

आषाढी वारीसाठी जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे शुक्रवारी, तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे शनिवारी पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे. राज्यभरातील संतांच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झालेल्या असून वारकऱ्यांच्या सेवेसाठी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने जय्यत तयारी केली आहे. आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी या माध्यमातून ३० जूनपर्यंत सार्वजनिक आरोग्य विभागाने एक लाख १२ हजार ६६८ वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा दिली आहे.

पंढरपूरला श्री विठ्ठलाच्या दर्शनाला जाणाऱ्या वारकऱ्यांची वारी सुखरूप व आरोग्यपूर्ण व्हावी यासाठी गतवर्षीपासून राज्य सरकारने आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत यंदाही वारकऱ्यांना पालखी मार्गावर, मुक्कामाच्या ठिकाणी तसेच पंढरपूर येथे मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यासाठी विभागाचे सहा हजार ३६८ अधिकारी आणि कर्मचारी कार्यरत आहेत.

पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर आपला दवाखाना असणार आहे. यासह ताप, सर्दी, खोकला, ड्रेसिंग, जुलाबाचा त्रास कोणाला होत असेल तर त्यासाठी दुचाकी रुग्णवाहिका (बाईक ॲम्बुलन्स) तैनात ठेवण्यात येणार आहेत. कोणालाही त्रास झाल्यास गर्दीतही त्वरित आरोग्य सेवा देणे यामुळे शक्य होणार आहे. या फिरत्या ॲम्बुलन्सबरोबरच १०२ व १०८ या ॲम्बुलन्सही पालखी मार्गावर सेवा देण्यासाठी कार्यरत असणार आहेत तसेच पालखीमध्ये दिंडी प्रमुखांना आरोग्य कीट देण्यात येणार आहे. महिलांसाठी प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची सोय असणार आहे. **(साभार : महासंवाद)**

## बदलते तंत्रज्ञान

# जिओ, एअरटेल, व्होडाफोनची दरवाढीची घोषणा कशासाठी?

रिलायन्स जिओ, भारती एअरटेल आणि व्होडाफोन आयडिया या भारतातील आघाडीच्या दूरसंचार ऑपरेटर कंपन्यांनी काही तासांच्या फरकाने शुल्कवाढीची घोषणा केली आहे. सध्या या कंपन्या ५जी सेवांच्या माध्यमातून या क्षेत्राची आर्थिक उन्नत्ती साधण्यासाठी प्रयत्नशील आहेत.





जिओने शुल्क १२-२५ टक्क्यांनी वाढवले आहे, शिवाय त्यांच्या प्रीमियन प्लानमध्येही मोठी वाढ होत आहे. त्यांचा सर्वात लोकप्रिय आणि सक्रिय प्लान म्हणजे, ज्यात २८ दिवसांची वैधता असते आणि रोजचा १.५ जीबी डेटा मिळतो. या प्लानमध्ये २५ टक्क्यांनी मोठी शुल्क वाढ झाली आहे. वोडाफोनने व्हीआय हेच शुल्क १०-२० टक्क्यांनी वाढवले आहे. जिओ आणि एअरटेलचे नवीन सेवादर ३ जुलैपासून लागू होणार आहेत, तर व्हीआयचे नवीन दर ४ जुलैपासून लागू होतील.

एअरटेलने एका निवेदनात म्हटले आहे की, भारतातील दूरसंचार कंपन्यांसाठी आर्थिकदृष्ट्या सुदृढ मॉडेल तयार करण्यासाठी प्रत्येक मोबाईल वापरकर्त्या व्यक्तीचा या सेवेवरील महसूल ३०० रुपयांच्या वर असणे गरजेचे आहे. म्हणूनच आम्ही नवीन शुल्काच्या घोषणांचे स्वागत करतो. २०२३ साली मार्च महिन्यापर्यंत (त्रैमासिक) एअरटेलचा प्रतिव्यक्ती महसूल दर २०९, जिओचा (त्रैमासिक) १८१.७० तर वोडाफोनचा (त्रैमासिक) १४६ इतका होता. २०१६मध्ये जिओने ४जी सेवा सुरू करण्याची घोषणा केली. त्यानंतर त्यांनी पहिल्या एका वर्षासाठी विनामूल्य आणि नंतर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा खूपच स्वस्त दरात सेवा दिली. यामुळे भारताच्या दूरसंचार क्षेत्रामध्ये विस्कळीतता आली. भारतात जगातील सर्वात स्वस्त डेटा दर मिळाला आणि परिणामी ऑनलाइन सेवांमध्ये प्रवेश करणाऱ्यांच्या संख्येत अतिरिक्त वाढ झाली, परंतु गेल्या काही काळापासून हळूहळू दरवाढ करण्याची मागणी होत आहे. या कंपन्यांनी ५जी सेवांसाठी बराच खर्च केला आहे. त्या मोठ्या गुंतवणुकीचा परतावा मिळवण्याकडे या सर्व कंपन्यांचा कल आहे. त्या दिशेने या कंपन्या कधी पाऊल टाकतील असा प्रश्न होता. सुरुवातीच्या काही काळासाठी या सर्व कंपन्यांनी एकसमान सेवेस, एकसमान किंमत असे सूत्र ठेवले होते, मात्र आता गुंतवणुकीच्या परताव्याची वेळ आली, असे या कंपन्यांना वाटते आहे, हेही या दरवाढीमागचे एक प्रमुख कारण आहे.

# गायक पं. निवृत्तीबुवा सरनाईक

हिंदुस्थानी रागसंगीताच्या क्षेत्रातील जयपूर-अत्रौली गायकीशी संबंधित एक अग्रगण्य गायक म्हणजे पं. निवृत्तीबुवा सरनाईक. त्यांचा जन्म ४ जुलै १९१२ रोजी कोल्हापूर येथे संगीतप्रिय कुटुंबात झाला. त्यांचे वडील तुकारामबुवा सरनाईक (मूळ उपनाम जाधव) हे एक नावाजलेले भजनी गायक होते.

निवृत्तीबुवांना दोन मोठे भाऊ व एक बहीण. निवृत्तीबुवा चार वर्षांचे असतानाच त्यांच्या मातोश्री निवर्तल्या. काही कालावधीनंतर त्यांच्या वडिलांनी दुसरा विवाह केला. कौटुंबिक कारणामुळे वडिलांनी आपल्या तीन अपत्यांस प्रथमपत्नीच्या माहेरी पाठवले. निवृत्तीबुवांना मात्र त्यांची बालवयातच दिसून आलेली गायनाची आवड लक्षात घेऊन त्यांनी त्यांचे सर्वांत कनिष्ठ बंधू शंकरराव सरनाईक यांच्या हवाली केले. 'महाराष्ट्र कोकिळ' शंकरराव सरनाईक हे प्रसिद्ध गायक-नट होते. मराठी नाटक व चित्रपटसृष्टीमध्ये आपल्या उत्तम अभिनयाने प्रख्यात झालेले गायक-अभिनेते अरुण सरनाईक यांचे ते वडील होत. तेव्हा शंकरराव हे गोविंदराव टेंबे यांच्या 'शिवराज संगीत नाटक मंडळी'मध्ये काम करीत असत. त्यांच्यासह निवृत्तीबुवांचे गायन-शिक्षण आणि नाटक मंडळीबरोबरची भ्रमंती चालू झाली. शंकरराव १९१९च्या सुमारास



## निमित्त

कोल्हापुरास परतले. इंदूर संस्थानचे राजे तुकोजीराव होळकर यांच्या पाठिंब्याने शंकररावांनी सुरू केलेल्या यशवंत संगीत नाटक मंडळीत कृष्णराव गोरे, सवाई गंधर्व, नत्थूखाँ असे अनेक मोठे गवई होते. आपल्या काकांसह या सर्वांच्याच गायनाचे संस्कार निवृत्तीबुवांवर झाले, पण त्यांच्या औपचारिक गायनशिक्षणाची सुरुवात मात्र गोविंदबुवा भावे यांच्यापासून झाली. तबलावादक बळवंत रुकडीकर व बाबालाल इस्लामपूरकर यांच्याकडून तबलावादनचे शिक्षणही त्यांनी घेतले. त्यामुळे त्यांच्या गायनातही लयतालाचे सूक्ष्म अंग दिसू लागले.

निवृत्तीबुवांनी आठ वर्षांचे असताना चलती दुनिया या हिंदी संगीत-नाटकात तोता-मैना या पात्रांपैकी 'तोता' हे पात्र साकारले. पुढे १४ वर्षांचे झाल्यावर नायिकेच्या भूमिकाही त्यांनी केल्या. काही काळ संगीत नाटकांत स्त्री-भूमिका करून त्यांनी नाव मिळवले. त्यांची सत्याग्रही या नाटकातील नारदाची भूमिका खूप गाजली. या काळात त्यांना सवाई गंधर्व यांच्याकडून किराणा घराण्याच्या स्वरमाधुर्यप्रधान गायकीची तालीम मिळाली. काका शंकरराव यांना ख्यालगायकी शिकण्याचा खूपच नाद होता, मात्र नाटक मंडळीच्या व्यापातून तालीम घ्यायला त्यांना वेळ होत नसे. अशा वेळी उस्तादांनी आपला पुतण्या निवृत्तीस शिकवावे, असे ते सांगत. त्यामुळे निवृत्तीबुवांना उस्ताद रजब अलीखाँ आणि उस्ताद अल्लादियाखाँ या दोघांचीही तालीम मिळाली. त्यांच्या गायनात किराणा व जयपूर-अत्रौली या दोन्ही गायकींचा सुरेख मिलाप झालेला दिसतो.

१९६६ साली निवृत्तीबुवा कोल्हापूरहून मुंबईस स्थायिक झाले. १९६९ ते १९७९ या कालावधीत मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागात गायनगुरू म्हणून त्यांनी काम केले. १९७९पासून पुढे काही काळ कोलकाता येथील आयटीसी संगीत रिसर्च अकादमीमध्ये ते गायनगुरू होते. कंपवाताच्या विकाराने ग्रासल्याने ते मुंबईस परतले. १६ फेब्रुवारी १९९४ रोजी त्यांचे निधन झाले.

**-मनीषा पोळ (मराठी विश्वकोष)**

## क्लिक...क्लिक...!

(छाया : शंतनु नाझरे)



**दिवे घाट : संत ज्ञानोबा माऊलींच्या पालखीदरम्यान वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा देताना कर्मचारी.**

## आरोग्य प्रहर

# चेहऱ्याला वाफ घेताना अशी घ्या काळजी...

पावसाळ्यात अनेक जण बाहेरून भिजून आल्यावर, सर्दी झाल्यावर आराम मिळावा यासाठी किंवा अगदी तजेलदार त्वचेसाठी चेहऱ्यावर वाफ घेत असतात, मात्र अशी वाफ घेताना तुम्ही तुमचे डोळे एखाद्या कापडाने झाकून घेता का? जर झाकत नसाल, तर तुमची सर्दी निघून जाईल, चेहऱ्यावर चमकही येईल, मात्र त्या वाफेचा त्रास डोळ्यांना होऊ शकतो.



इन्स्टाग्राम या सोशल मीडियावर आयुर्वेदिक डॉ. ऐश्वर्या संतोष यांनी, चेहऱ्यावर वाफ घेण्याबाद्दल माहिती देणारा एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्या व्हिडीओला पंचमहाभूतांपैकी डोळे हे अग्नी तत्त्वासह जोडलेले असतात, तर डोके हे जल किंवा पृथ्वी तत्त्वाशी संबंधित असते. अग्नी तत्त्व असणाऱ्या डोळ्यांना गरम वाफ दिल्यास डोळ्यांची जळजळ होणे, अंधुक दिसणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात, अशी माहिती देणारी कॅप्शन देण्यात आली आहे.

गुडुची आयुर्वेदाचे डॉ. यमुना बी.एस. म्हणतात, वाफ घेताना डोळे न झाकल्यास थेट वाफांमुळे डोळ्यांची जळजळ होऊ शकते, तसेच डोळे लाल होणे, खुपणे, कोरडेपणा किंवा डोळ्यांवर ताण येण्यासारख्या गोष्टी होऊ शकतात.

चेहऱ्यावर वाफ घेताना डोळे झाकून घेतल्यास, अधिक आरामदायी अनुभव मिळू शकतो, तर दमट-उष्ण हवामानामुळे डोळे संवेदनशील झाले असल्यास डोळ्यांवर रुमाल बांधण्यामुळे त्यांना आराम मिळू शकतो, असे शारदा हॉस्पिटलच्या ईएनटी विभागाचे एचओडी डॉ. रोहित सक्सेना सांगतात.

डोळ्यांना वाफ लागल्याने तुमच्या डोळ्यांतील ओलावा नाहीसा होऊन, ते कोरडे होण्याची शक्यता असते. अशा कोरड्या डोळ्यांना त्यांचा ओलावा परत मिळण्यासाठी त्या व्यक्तीला आयड्रॉप्स किंवा इतर उपचारांची गरज भासू शकते. जर वाफेचे तापमान अधिक असेल, तर डोळे, पापण्या आणि डोळ्यांभोवतीची नाजूक त्वचा भाजू शकते अथवा त्यांना मोठ्या प्रमाणावर इजा पोहोचू शकते, असे डॉ. सक्सेना यांनी सांगितले आहे.

सुधा आयुर्वेदिक केंद्राच्या संस्थापक डॉ. सुधा अशोकन यांच्या म्हणण्यानुसार चेहऱ्यावर वाफ घेताना म्हणजेच स्टीम थेरपीदरम्यान आपण कोणत्या प्रकारचे कापड निवडतो ते योग्य आहार निवडण्याइतकेच महत्त्वाचे आहे. आपणच आपली काळजी घेतली पाहिजे.

# रोहा-नागोठणे मार्गावरील सर्व्हिस रोडची दुरवस्था

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील अष्टमी रेल्वे गेटला पर्याय म्हणून उड्डाणपूल बांधण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे रोहा-नागोठणे मार्गावरील या उड्डाणपूलालगत सर्व्हिस रोड तयार करण्यात आले आहे. या उड्डाणपूल असलेल्या सर्विस रोडची दुरवस्था झाली आहे.

प्रचंड खड्डे या रोडवर पडल्याने वाहनधारकांना वाहन चालवताना प्रचंड मनस्ताप होत आहे. या संबंधित रेल्वे प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित उड्डाणपूल ठेकेदार यांचे दुर्लक्ष झाल्याचे येथील प्रवासी व नागरिकांचे म्हणणे आहे.



रोहा तालुक्यातील मध्य रेल्वेच्या अष्टमी येथील रेल्वे गेटचा नागरिकांना त्रास जाणवत होता. या मार्गावर सातत्याने रेल्वे जात असल्याने हा रेल्वे गेट सातत्याने बंद राहत असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या प्रवासांना हे गेट उघडेपर्यंत ताटकळत बसावे लागत होते. ही समस्या दूर करण्यासाठी रेल्वे व राज्य सरकारच्या माध्यमातून अष्टमी रेल्वे गेटला पर्यायी मार्ग म्हणून उड्डाणपूल मंजूर करण्यात आला, परंतु हे काम धिम्या गतीने चालू आहे. गेली दोन वर्ष पासून उड्डाणपूल बांधण्यात येत आहे. रोहा-नागोठणे मुख्य रस्त्यावर हे उड्डाणपूल असल्याने वाहतूक सुरळीत राहावी यासाठी या उड्डाणपूललगत सर्व्हिस रोड तयार करण्यात आले. हे सर्व्हिस रोड या पावसाळ्यात नादुरुस्त झाल्याचे दिसून येते या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना या खड्ड्यांचा त्रास होत आहे दुचाकी स्वार या खड्ड्यातून प्रवास करत असताना अपघाताला सामोरे जावे लागत आहे.

या संबंधित ठेकेदारांचे दुर्लक्ष होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या मार्गावर नागोठणे, मुंबई, पुणे, अलिबागकडे मोठ्या प्रमाणात वाहने जात असतात त्या मार्गातून जात असताना वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित खात्याने या समस्यांकडे लक्ष घालून हा रस्ता चांगला करावा, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

# नायट्रोजन गॅसचा टँकर कशेडी घाटातील दरीत कोसळला

## चालक जखमी



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटात उरण ते लोटे नायट्रोजन गॅस वाहतूक करणारा आयशर टेम्पो खचलेल्या रस्त्यावरून चढत असताना वाहनाने गती न घेतल्याने पाठीमागे येऊन खोल दरीत कोसळला. या अपघातात चालक गंभीर झाला असून वायू गळतीमुळे वाहतूक पोलीस सतर्कतेने प्रसंग हाताळत असल्याचे दिसून आले. बुधवारी (दि. ३) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास भोगाव गावाच्या हद्दीत हा अपघात झाला आहे.

पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटातून चालक अफिझुर रेहमान (वय ५५ वर्षे) हा आयशर ट्रक (एमएच ०५ एएम २८१४) यामध्ये नायट्रोजन गॅस भरून उरण ते लोटे येथे घेऊन जात असताना भोगाव गावच्या हद्दीत आले असता येथील खचलेल्या रस्त्यावर चढताना गाडीने गती न घेतल्याने गाडी मागे येऊन थेट संरक्षक कठडे तोडून सुमारे ७० फूट दरीत कोसळला. या अपघातात चालक अफिझुर रेहमान हा जखमी झाला आहे.

अपघाताची माहिती मिळताच कशेडी महामार्ग पोलीस मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक प्रवीण धडे, उपनिरीक्षक समेळ सुर्वे, पोलीस हवालदार चिकणे, रामागडे, माजलकर यांच्यासह पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल जाधव, सहाय्यक फौजदार जयसिंग पवार, पोलीस हवालदार रवींद्र सरणेकर, पोलीस हवालदार घुले, ट्रॅफिक हवालदार धायगुडे, १०८ रुग्णवाहिकेची संपूर्ण टीम, महाड नगर परिषद आणि महाड एमआयडीसी येथील अग्निशामक यंत्रणेला कशेडी व पोलादपूर पोलिसांनी पाचारण केले. येथील तीन अग्निशामक बंब घटनास्थळी तातडीने पोहचले. महामार्ग पोलिसांनी दोन्ही बाजूची वाहतूक पुर्ण सतर्कता बाळगत सुरू ठेवली आहे.

# नानेघोळ बाबरवाडी येथे कृषीदिन उत्साहात



**पोलादपूर : प्रतिनिधी**

हरितक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांचा १ जुलै हा जन्मदिवस कृषीदिन म्हणून साजरा केला जातो. जगाचा पोशिंदा असणाऱ्या बळीराजाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असल्याने या दिवसाचे औचित्य साधून तालुका कृषी अधिकारी कार्यालय पोलादपूर व पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नानेघोळ बाबरवाडी येथे कृषीदिन साजरा करण्यात आला.

या कृषीदिनानिमित्त स्व.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन सरपंच शांताराम जंगम, तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील, गटविकास अधिकारी दिप्ती गाट आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे स्वागत संजय मोदी यांनी व सूत्रसंचालन पोलादपूर मंडळ कृषी अधिकारी मनोज गांधी यांनी केले. या कृषीदिनावेळी मान्यवरांकडून शेताच्या बांधावर केलेली झाडे लागवड, युवा शेतकरी प्रमाणपत्र वितरण, शेतकऱ्यांनीच शेतकऱ्यांसाठी केलेली प्रेरणादायी मनोगते, तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील व गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांची शेतकऱ्यांप्रती झालेला मार्गदर्शनपर संवाद, या सर्व गोष्टी कृषीदिनाच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरल्या.

या कार्यक्रमावेळी तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी पर्यवेक्षक भरत कदम, श्रीरंग मोरे, रवींद्र गुंड, नितीन धायगुडे तसेच पं.स.कृषी अधिकारी वसावे, साळी, विस्तार अधिकारी धीवरे, क्षेत्रीय स्तरावरील सर्व कृषी सहाय्यक बंधू-भगिनी, आत्मा बीटीएम, या वेळी सागर गोपाळ मोरे- गोळेगणी, सुनील महादेव अहिरे-गोवेले, हनुमंत धोंडू दळवी-दाभिळ, मंदाकिनी सुनील बडदे-चरई, शेखर संतोष चिकणे-दिवील, अमर राजेंद्र कदम-नानेघोळ, अरुण गोपाळ भिलारे-किनेश्वर, प्रकाश रामचंद्र सालेकर-वाकण, मनोज गोविंद जगताप-वझरवाडी, विनोद दत्ताराम दळवी-फौजदारवाडी, शुभम संतोष कदम-कोतवाल बुद्रुक इत्यादी पोलादपूर तालुका युवा शेतकरी प्रमाणपत्र प्राप्त शेतकरी उपस्थित होते. या वेळी त्यांच्यासोबत ज्येष्ठ शेतकरी रामचंद्र महादेव कदम व तालुक्यातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

या कृषीदिनाचे नियोजन वाकणचे कृषी सहाय्यक निवृत्ती बरकडे व ग्रामसेविका गंभीरे यांनी केले व बाबरवाडीच्या मुंबई तरुण मंडळाने केले.

# पाली डम्पिंग ग्राउंड येथील विद्युत खांब धोकादायक

**पाली : प्रतिनिधी**

शहराचे डम्पिंग ग्राउंड हे टेंबी वसाहतीजवळ आहे. येथील रस्त्यावर असलेला एक विद्युत खांब धोकादायक झाला आहे. तो खाली गंजून जीर्ण होऊन वाकला आहे. परिणामी वारा पावसामध्ये तो कधीही कोसळू शकतो. त्यामुळे मोठी दुर्घटना होऊ शकते.



हा रस्ता शिळोशी व मढाळी गावांनादेखील जोडतो. त्यामुळे येथून मोठ्या प्रमाणात रहदारी सुरू असते. अशावेळी हा विद्युत खांब कोसळल्यास अपघात घडू शकतो. त्यामुळे हा विद्युत खांब लागलीच दुरुस्त करावा किंवा या जागी दुसरा खांब बसवण्यात यावा, अशी मागणी येथील स्थानिक नागरिकांनी केली आहे. याशिवाय नगरपंचायतचे सफाई कर्मचारी या ठिकाणी नियमित कचरा टाकण्यासाठी येतात. त्यांनाही या खांबापासून धोका संभवतो.

हा जीर्ण विद्युत खांब बदलण्यासंदर्भात वीज महावितरण कार्यालयाकडे लवकरच पत्रव्यवहार करण्यात येईल. तोपर्यंत नागरिकांनी येथून जाताना खबरदारी घ्यावी, असे येथील प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# शामल पाटीलचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर नांदगाव येथील विद्यार्थिनी शामल नथुराम पाटील हिने इयत्ता दहावीत ८५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला होता.

ही विद्यार्थी या विद्यालयातून प्रथम क्रमांक घेऊन पहिली आली होती. या निकालाच्या पार्श्वभूमीवर मझगाव येथील अंजुमन वसीऊल तलीम एज्युकेशनल ट्रस्ट रायगड, मेहरुनिसा अब्बास फकिह इंडस्ट्रियल ट्रैनिंग इन्स्टिट्यूटच्या वतीने संस्थेचे मेकॅनिकल ड्रोपस्मन शाखेचे निर्देशक राहिष अब्दुल रऊफ दखनी यांच्या शुभ हस्ते शामल पाटील या विद्यार्थिनी गोल्ड मेडल,सन्मान चिन्ह, प्रशस्ती पत्रक देऊन गौरवण्यात आले आहे.

या वेळी नांदगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, सागर राऊत आदी उपस्थित होते.



# समुद्र किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम

## प्लास्टिक पिशवी मुक्त दिनाचे औचित्य

**मुरूड : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय प्लॅस्टिक बॅग मुक्त दिन ३ जुलै रोजी असतो. या दिनाचे औचित्य साधून मुरूड शहरातील समुद्रकिनारी क्रिकेट खेळावयास येणारी मुरूड, मजगाव, नांदगाव येथील सर्व क्रिकेट पटूनी समुद्र किनारा सवच्टा राबवून संपूर्ण किनारा स्वच्छ केला. रोज सकाळी क्रिकेट खेळावयास येणाऱ्या सर्व खेळाडूंनी एकत्र येऊन ही स्वछता मोहीम राबवल्या त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

मॉर्निंग क्लब मुरूड, मजगाव नांदगाव क्लबचे अध्यक्ष डॉ.प्रवीण जैन यांचे अवाहनाला प्रतिसाद देऊन, मुरुड समुद्रकिनारी स्वच्छता अभियान राबवण्यासाठी असंख्य तरुण एकवटले होते.



या मध्ये तरुण पिढीसोबत ४०,५०,६० व त्यावरील सर्व वयोगटा तील क्रिकेट खेळाडू सहभागी झाले होते. हे या मॉर्निंग क्लब चे वैशिष्ट होते.

या अभियानावेळी प्रवीण जैन, मेडिकल एसोसिएशन चे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, तसेच विजय पैर, मुस्ताक अपराध, संतोष बुल्लू, दिलीप पाटिल, कैलास नाक्ति, योगेंद्र गोयजी, ओमकार होनावर, इस्माईल शेख सुबुक शेख, असे अनेक खेलाडू सहभागी होते.विजय पैर यांनी समुद्र किनारी होनारा कचरा अतिशय आरोग्य साठी घातक असल्या चे संगून लवकर पुनः एकदा अशाप्रकारे स्वच्छ मोहीम राबवणार असल्याचे सांगितले. तर वैद्यकीय अधिकारी डॉक्टर प्रवीण जैन यांनी सांगितले की,समुद्र किनारी लाखोच्या संख्येने पर्यटक येत असतात. समुद्र किनारा स्वच्छ करणे खूप आवश्यक होते. ३ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय प्लास्टिक बॅग मुक्त दिन साजरा होतो म्हणून या दिवसाची निवड करून ही स्वच्छता मोहीम राबवली असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

या स्वच्छता मोहिमेमध्ये चार वर्षांचा भाविक वाघरे या मुलाने मनापासून स्वच्छता करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मुरुड समुद्र किनारी वाहून आलेला पाला पाचोळा, प्लास्टिक बाटल्या, प्लास्टिक पिशव्या, काचेच्या बोटेल आदी सर्व कचरा गोळा करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली.



**रोहा : मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनासाठी कागदपत्रे व अर्ज मिळविण्यासाठी येथील तहसीलदार कार्यालयाच्या सेतू केंद्रावरील झालेली गर्दी.**



**रोहा : तालुक्यातील ऐनघर ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी अर्चना सचिन भोसले यांची निवड झाली. त्याबद्दल त्यांचे पत्रकार महादेव सरसंबे, विनोद जंगम, नितीश सपकाळ, महेंद्र माने, श्याम लोखंडे, विश्र्वास निकम, नंदकुमार कळमकर, भाजप नेते निमेश वाघमारे, सचिन भोसले आदींनी अभिनंदन केले.**

# खालापूर येथे विषेश शोध मोहीम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

तहसील कार्यालय खालापूर येथे तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली शाळाबाह्य अनियमित व स्थलांतरित बालकांना शिक्षणाचा प्रवाह अबाधित राखण्यासाठी विशेष शोध मोहिमेसाठी तालुकास्तरीय समितीची सभा आयोजित करण्यात आली होती.



या सभेचे प्रास्ताविक पालवे सर यांनी केले. या सभेत शाळाबाह्य अनियमित व स्थलांतरित विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण दिनांक ५ ते २० जुलै २०२४पर्यंत पूर्ण पूर्ण करून त्या मुलांना जवळच्या शाळेत कशा दाखल करता येईल, यावर चर्चा करण्यात आली. खालापूर तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी कैलास चोरमले यांनी केंद्रनिहाय सभा आयोजित करून सर्वेक्षण सुव्यवस्थित व वेळेवर पूर्ण कसे करता येईल याचे नियोजन सांगितले. या सभेला खालापूर तालुक्यातील आयुब तांबोळी, तालुका आरोग्य अधिकारी कल्याणी डोंगरे व कैलास चोरमले गटशिक्षणाधिकारी खालापूर, तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख व बालरक्षक उपस्थित होते. आभार मस्तान बोरगे तालुका बालरक्षक प्रतिनिधी यांनी मानले.

# मुळगाव येथील शाळेला २५ झाडे, २५ कुंड्या भेट

**खोपोली : प्रतिनिधी**

राजीव गांधी प्राथमिक शाळा क्रमांक १० मुळगाव येथे लाईट ऑफ लाईटचे प्रामाणिक मनमिळाऊ शिक्षक महेंद्र घारे यांनी शाळेला २५ कुंड्या आणि २५ झाडे भेट दिली त्याबद्दल शाळेतर्फे आभार व्यक्त करण्यात आले.



या वेळी शाळेचे मुख्याध्यापक निलेश थरकुडे तसेच सहशिक्षिका तेजश्री थोरात व व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्योती पवार उपस्थित होत्या.

पर्यावरण अबधीत राखण्यासाठी वृक्षारोपण करणे काळाची गरज आहे, आता त्याचे महत्त्व समजले गरजेचे असल्याचे या वेळी महेंद्र घारे यांनी सांगितले.


## Declaration

I Ravindra Laxman Kulkarni Ex-POCD1 No. 163469-Y from Indian Navy hereby state that only the year of my mother Mrs. Urmila Laxman Kulkarni is mentioned in my service records as 1936. Her birth date 1st January is not mentioned . As per Adhar card her date of birth is 01/01/1936.Notary no - 4219/2024 about the same has been made before the Executive Magistrate, Uran on 03/07/2024

**Date:**03/07/2024

sd/-
Ravindra Laxman Kulkarni

# नवी मुंबईत टाकाऊ कपडे पुनर्प्रक्रियेचा प्रायोगिक प्रकल्प

## केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालयामार्फत उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालयामार्फत ग्राहक वापरानंतरचे कपडे पुनर्प्रक्रियेचा प्रायोगिक प्रकल्प नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येत असून याविषयी जनजागृती करण्याकरीता नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील सोसायटी पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात झाली.





नवी मुंबई महापालिका क्षेत्रात दैनंदिन कचऱ्याचे ओला, सुका व घरगुती घातक अशा तीन प्रकारे वर्गीकरण केले जात असताना त्यामधून टाकाऊ कपड्यांचेही स्वतंत्र वर्गीकरण करण्यात येऊन हे कपडे पुनर्वापरात आणण्याबाबतचा हा अभिनव प्रकल्प प्रायोगिक स्वरुपात राबविण्यासाठी नवी मुंबई शहराची निवड केल्याबद्दल केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालयाचे नमुंमपा अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी आभार मानले व जागरुक नवी मुंबईकर नागरिक यात सक्रिय सहभागी घेऊन हा उपक्रम यशस्वी करतील, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी उपस्थितांशी संवाद साधताना केंद्रीय वस्त्र मंत्रालयाचे संचालक तपनकुमार राऊत यांनी नवी मुंबई शहर हे स्वच्छतेविषयी अतिशय जागरुकतेने काम करीत असून नाविन्यपूर्ण स्वच्छता उपक्रम राबविण्यात नेहमीच आघाडीवर असते, त्यामुळे हा अभिनव उपक्रम राबविण्यासाठी नवी मुंबईची निवड करण्यात आली असल्याचे सांगितले. यामध्ये केंद्रीय वस्त्र समिती, नवी मुंबई महापालिका तसेच स्वयंसेवी संस्था यांचा एकत्रित सहयोग असणार असून सोसायटी पातळीवर कपडे संकलन कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

याबाबत सर्वेक्षण करण्यात येत असून नागरिकांकडून वापरात नसलेले टाकून दिले जाणारे कपडे म्हणजे कचरा नाही, त्याचा पुनर्वापर होऊ शकतो व त्यावर पुनर्प्रक्रिया करता येऊ शकते हे लक्षात घेत हा प्रकल्प राबविला जाणार असून या प्रक्रियेत स्वयंसहाय्यता बचत गटांनाही काम मिळेल व महिलांचे सक्षमीकरण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लोकसहभागाशिवाय हा उपक्रम यशस्वी होणे शक्य नाही याकरीता सोसायटी पदाधिकाऱ्यांशी सुसंवाद करण्यात येत असल्याचे सांगत नवी मुंबईकर नागरिक यात मोठया प्रमाणावर सहभागी होऊन हा उपक्रम यशस्वी करतील आणि नवी मुंबईचे महापालिकेचे मॉडेल म्हणून हा उपक्रम ओळखला जाईल, अशी खात्री असल्याचे त्यांनी सांगितले.

### सोसायटी पदाधिकाऱ्यांना आवाहन

**हा उपकम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक सोसायटीकरिता एका समन्वयकाची नेमणूक करण्यात येईल व त्यांच्या माध्यमातून हा प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात येईल अशी माहिती अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी दिली व हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी नवी मुंबई महापालिकेस संपूर्ण सहकार्य करावे, असे उपस्थित सोसायटी पदाधिकाऱ्यांना आवाहन केले.**

सध्याच्या फॅशन ट्रेंड बदलाच्या प्रचंड गतिमान युगात फॅशन सायकल आता केवळ १५ दिवसांवर आली असल्याचे चित्र असून कचरा म्हणून टाकल्या जाणाऱ्या कपड्यांचा गंभीर प्रश्न आपल्यासमोर आहे, यावर सकारात्मक उत्तर शोधण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प राबविला जात असल्याचे ते म्हणाले.

सदयस्थितीत 'माणुसकीचे देणे-घेणे' ही 'थ्री आर' सेंटर्सची अभिनव संकल्पना नवी मुंबई महापालिकेमार्फत राबविण्यात येत असून ठिकठिकाणी ९४ केंद्रे आहेत. येथे नागरिक त्यांना नको असलेल्या वस्तू आणून ठेवत असून गरजू व्यक्ती त्यामधील त्यांना उपयुक्त असणाऱ्या वस्तू घेऊन जात असतात. यामध्ये कपड्यांचाही समावेश असून यापुढील काळात राबविल्या जाणाऱ्या नवीन प्रकल्पाव्दारे कपडयाच्या पुनर्प्रक्रियेचे नवे दालन खुले होणार आहे.

# विद्यार्थ्यांनी केले 'स्वच्छता मतदान'

**नवी मुंबई : बातमीदार**

'स्वच्छ सर्वेक्षण २०२४'ला सामोरे जाताना सर्व समाज घटकांचा सहभाग घेण्याची भूमिका नजरेसमोर ठेवत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार स्वच्छता कार्यामध्ये लोकसहभागावर भर देण्यात येत आहे.



या अनुषंगाने शहराचे भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील शहर स्वच्छतेविषयीच्या प्रतिक्रिया जाणून घेता याव्यात व या माध्यमातून त्यांच्या मनावर नकळतपणे स्वच्छतेचा संस्कार व्हावा यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या ८० शाळांमध्ये पाचवी ते दहावीच्या मुलांकरिता 'स्वच्छता मतदान' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात २१ हजाराहून अधिक मुलांनी सहभागी होताना आपल्याला आई-बाबांसारखे मतदान करता येणार आहे याचा आनंद व्यक्त केला व अत्यंत उत्साहात स्वच्छतेचे मतदान केले.

'नवी मुंबई शहराच्या स्वच्छतेसाठी मतदान - विद्यार्थ्यांचा अभिप्राय' अशा शिर्षकाची मतपत्रिका (बॅलेट) प्रत्येक विद्यार्थ्याला देण्यात आली होती. स्वच्छता विषयक ७ प्रश्नांची उत्तरे 'हो / नाही' स्वरूपात विद्यार्थ्यांनी मतपत्रिकेवर नोंदवावयाची होती. या प्रश्नांमध्ये - तुमच्या घरातील कचरा घेऊन जाण्यासाठी परिसरात रोज घंटा गाडी येत काय?, तुमच्या घरातील कचरा ओला व सुका असा वेगळा करुन घंटा गाडीमध्ये जमा करता काय?, तुमच्या घराशेजारी असलेले नाले स्वच्छ आहेत काय?, तुम्हाला आपल्या शहरातील 'थ्री आर' केंद्रांची माहिती आहे काय?, अलिकडील काळात तुम्ही शहरातील सामुदायिक /सार्वजनिक शौचालयाचा वापर केला आहे काय?, शहरातील सामुदायिक / सार्वजनिक शौचालये स्वच्छ व व्यवस्थित आहेत काय?, डिजीटल नकाशांवर तुम्हाला जवळचे सामुदायिक / सार्वजनिक शौचालय शोधता येऊ शकते याची माहिती आहे काय? - अशा सात प्रश्नांचा समावेश होता. या प्रश्नावलीनंतर 'तुम्ही तुमच्या परिसराच्या एकूण स्वच्छतेचे मूल्यांकन कसे कराल?' आणि 'तुम्ही शहराच्या एकूण स्वच्छतेला किती गुण दयाल?' असे दोन प्रश्न समाविष्ट होते व याची उत्तरे देताना विद्यार्थ्यांनी पाच पैकी गुण नमूद करावयाचे होते.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा मतदानाचा अनुभव अतिशय आगळावेगळा होता. त्यामुळे सर्व विद्यार्थी मतदान प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी उत्सुक होते. शाळाशाळांमध्ये याकरिता मतदान केंद्रासारखी रचना करण्यात आली होती.

यामध्ये संपूर्ण मतदान प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणारा मतदान केंद्राध्यक्ष, मतदाराचे नाव पुकारणारा व ओळख पटविणारा मतदान अधिकारी - १, मतदानासाठी बोटावर शाई लावून परवानगी देणारा मतदान अधिकारी - २ व मतदाराच्या नावाची नोंद करणारा मतदान अधिकारी - ३ यांची नेमणूक करण्यात आली होती. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्याला दिलेल्या मतपत्रिकेवर नमूद सात प्रश्नांची हो / नाही यापैकी उत्तरे देत व २ प्रश्नांना गुणांकन देत, स्वच्छतेचे अभिप्राय नोंदवून मतपत्रिका दुमडून मतपेटीत टाकली. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर घोषणा करुन मतपेटी सील करण्यात आली. सदर मतपेटी दुसऱ्या दिवशी उघडण्यात येऊन मतपत्रिकेवर नोंदविलेल्या प्रश्ननिहाय 'होय किंवा नाही' या खुणांच्या आधारे प्रपत्रामध्ये माहिती भरली जाणार आहे व ही प्रपत्रे एकूण मतदान निकालाच्या प्रतीसह मुख्याध्यापकांकडून संबंधित केंद्र समन्वयक यांच्याकडे जमा केली जाणार आहेत.

विद्यार्थ्यांना लोकशाहीची प्रक्रिया समजण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता विषयक जनजागृती होण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयोगी ठरल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

## निवडक

### नागरीकांना छत्री वाटप



**नवी मुंबई :** कै. कृष्णा गणपतराव सुतार सेवा ट्रस्ट, कै. चंद्रकला कृष्णा सुतार सेवा ट्रस्ट यांच्या माध्यमातून व भारतीय जनता पार्टी नवी मुंबई कार्यकरणी सदस्य सुनील सुतार यांच्या वतीने छत्री वाटप करण्यात आले. पावसाळ्याच्या अनुषंगाने १७ वाशी येथील जनसंपर्क कार्यालयात गरीब, गरजू आणि सोसायटी मध्ये काम करणाऱ्या महिला, पुरुष कामगार यांना छत्र्या वाटण्यात आल्या. या वेळी नागरिकांनी सुनील सुतार यांचे आभार मानले. सुतार हे सातत्याने विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबवत असतात.

### विभागीय लोकशाही दिन

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवारी (दि. ८) सकाळी १०.३० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे परिपत्रकाद्वारे उपायुक्त (सामान्य प्रशासन) कोकणभवन अमोल यादव यांनी कळविले आहे.

### पंतप्रधान स्वनिधी मार्गदर्शन शिबिर

**नवी मुंबई :** नेरूळ ब विभाग कार्यालय येथे शिबिराचे नवी मुंबई महानगरम्पालिका व ऑल इंडिया इन्स्टिट्यूटच्या संयुक्त विद्यमानाने पंतप्रधान स्वानिधी मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. त्या वेळी उपस्थित राहून गरजवंत नागरिकांपर्यंत माहिती पोहचवुन लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. ही योजना इतर गरजवंत महिला पुरुषांपर्यंत पोहोचवावी अधिक संपर्कासाठी भाजप जनसंपर्क कार्यालय शिरवणे गाव मराठी शाळेजवळ येथे संपर्क साधावा असे ही आवाहन माजी नगरसेविका व नवी मुंबई महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष भाजप माधुरी सुतार यांच्यातर्फे करण्यात आले. या वेळी स्वाती तांडेल, अशोक भवारे, राजेश्री व विद्या अशा अधिकारी कर्मचारी वर्गाने विशेष प्रयत्न केले.



# रानसई बंगल्याचीवाडी येथे कृषीदिन साजरा

**उरण : प्रतिनिधी**

उरण पंचायत समितीचा कृषी विभाग आणि उरण तालुका कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीदिनी रानसई बंगल्याच्या वाडीत, आदिवासी ठाकूर बांधवांच्या उपस्थितीत कृषी दिन साजरा करण्यात आला. या वेळी रानसई बंगल्याची वाडी येथे विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली.



या वेळी झालेल्या कार्यक्रमात सहाय्यक गटविकास अधिकारी संतोषसिंग डाबेराव यांनी कृषी उत्पादनाचा वाढता खर्च, मिळणारे अपुरे उत्पन्न याचा विचार करता कृषी पूरक अशा शेळीपालन, कुकुट पालन मत्स्य शेती, दुग्ध व्यवसाय आदी अनेक कृषी पूरक व्यवसायांची कृषी व्यवसायाला शेतकऱ्यांनी जोड देणे महत्त्वाचे असून, शेतकऱ्यांनी यासाठी स्वतःहून पुढे यायला हवे. त्यांना हवी ती शासनामार्फत मदत केली जाईल. असे त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले.

तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ - नारनवर यांनी भाताची चारसुत्री लागवड, रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड, भात पिक विमा योजना आदी विषयांवर सविस्तर माहिती दिली. यावेळी कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांना महाराष्ट्र शासनाचा कृषीनिष्ठ पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा या कार्यक्रमाच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ - नारनवर, पशुधन विकास अधिकारी भोजने, ग्रामविकास अधिकारी महेश पवार, सहाय्यक कृषी अधिकारी सुरज घरत, ग्रामीण पाणीपुरवठा अभियंता श्री. चव्हाण, कृषीच्या विस्तार अधिकारी अश्विनी जाधव, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, सरपंच राधा पारधी, रानसईचे ग्रामसेवक प्रमोद मुकुंदे, तसेच कृषी सहाय्यक व पंचायत समितीचे कर्मचारी, आदिवासी ठाकूर बांधव तसेच चिरनेर परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रसायनीत विविध जातींच्या वृक्षांची लागवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दिव्य ज्योति जाग्रति संस्थान, शाखा चाकण द्वारा संचालित जागतिक पर्यावरण दिनिनिमित्त मोहोपाडा रसायनी क्षेत्रामध्ये संस्थानच्या संरक्षण प्रकल्पाअंतर्गत सामुदायिक वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (दि. ३०) करण्यात आले होते. या वेळी मोहोपाडा येथील जनता विद्यालय, रिस मैदान, टाकेदेवी दांडफाटा, एमआयडीसी डोंगर आदी परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश मोहोपाडा सोबतच संपुर्ण भारतामध्ये पर्यावरणीय स्थिरता आणि समुदाय प्रतिबद्धता वाढवणे ही असून या उपक्रमामध्ये स्थानिक शाळा, व्यवसाय आणि रहिवाशांच्या अंदाजे १०० स्वयंसेवकांचा समावेश असलेला एक सहयोगी प्रयत्न आहे. संगठित व सामूहिक प्रयत्नाने नियुक्त केलेल्या ठिकाणी अंदाजे २०० ते ३०० झाडे लावण्यात आली.यावेळी विविध पोस्टर्सच्या माध्यमाने जनमानसात पर्यवरणा विषयी संदेश देण्याचा प्रयत्न कासंस्थानच्या स्वयंसेवकांनी केला.

सतत होत असलेल्या पर्यावरणीय संकटाला लक्षात घेऊन दिव्य ज्योति जाग्रति संस्थान द्वारा संरक्षण प्रकल्पाच्या अंतर्गत पर्यावरण संतुलनाला पुन्हा स्थापित करण्यासाठी जल संरक्षण, झाडाची कटाई थांबवण्यासाठी वनसंरक्षण, ऊर्जा संकटांना पूर्ण करण्यासाठी ऊर्जा संरक्षण असे उपक्रम ठिकठिकाणी राबवण्यात येत आहेत.




# रसायनीत मोकाट जनावरांची 'बजरंगी'कडून विशेष काळजी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विश्व हिंदु परिषद आणि बजरंग दल यांच्या संयुक्त विद्यमाने साकारलेले रसायनी पाताळगंगा येथील बजरंगी मित्र मंडळाचे गोमाता संरक्षक मलेश गुडसे यांच्या सहकार्यातून बजरंगी बांधव परिसरातील गोमातांच्या आरोग्याची काळजी घेताना दिसतात.

परिसरातील गोमांताना कोणतीही इजा झाल्यास हे बजरंगी बांधव एकत्रित येतात आणि पशुवैद्यकिय डॉक्टरांशी संपर्क करून गोमातेचे संरक्षण करताना परिसरात कुठे ना कुठे दिसतातच. रसायनी परिसरातील काही गाईंची नखे व शींगे वाढली आहेत, त्यांना चालताना खुप त्रास होतो, अशी माहिती बजरंगी बांधवांजवळ अनेकांनी बोलून दाखविली. मोहोपाडा येथील परिसरात एका गाईंचे शिंग वक्र असल्याने ती गाय चालताना तिच्या डोक्याला शिंग लागत असल्याने ही गाय जखमी होवून त्यातून कित्येक दिवस रक्तत्राव सुरू होता. हे बजरंगी बांधवांनी लक्षात घेऊन त्या गाईला अडवून सदर शिंगाचा लोबकणारा



भाग कट केला आणि जखमेवर हळद लावली.

या वेळी गोरक्षक प्रमुख मलेश गुडसे, अध्यक्ष जनार्दन मालुसरे, संयोजक, प्रशांत तांबोळी, गोरक्षक प्रमुख राजा जांभुळकर, सहसयोजक दिनेश पडवळ, नामदेव केदारी, संदीप तांबोळी, सुभाष खुडे, सुभोद मिश्रा आदी उपस्थित होते. बजरंग दलाच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# जून महिन्यातील 13 सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेतील प्रत्येक अधिकारी-कर्मचारी यांनी आपल्या पदाची जबाबदारी चांगल्या रितीने पार पाडल्यामुळेच आज नवी मुंबईचा नावलौकिक सर्वत्र आहे. त्याचप्रमाणे सेवानिवृत्ती समारंभात अधिकाऱ्यापासून चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यापर्यंत सर्वांना समान न्याय देत नवी मुंबई महापालिकेने इतरांनी अनुकरण करावा असा पायंडा पाडला असल्याचे मत अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांनी व्यक्त केले. सेवानिवृत्तीच्या दिवशीच नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांना सेवेचे देय्य लाभ मिळावेत अशा प्रकारच्या महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रशासनाने कार्यवाही पूर्ण केली असल्याचा विशेष उल्लेख त्यांनी मनोगतात केला.



जून २०२४मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या १३ अधिकारी, कर्मचारी व शिक्षक यांच्या मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झालेल्या सेवानिवृत्ती समारंभ प्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आदी उपस्थित होते.

जून २०२४ मध्ये सेवानिवृत्त होणारे कार्यकारी अभियंता गिरीश गुमास्ते व जयकुमार चिंचोळे, मुख्याध्यापक इंद्रप्रकाश पाल, अग्निशमन केंद्र अधिकारी जगदीश पाटील व सहा.अग्निशमन केंद्र अधिकारी विजय शेडगे, स्वच्छता अधिकारी दिनेश वाघुळदे, प्राथमिक शिक्षिका छाया पाटील, वरिष्ठ लिपिक मोहन पाटील, आरोग्य सहाय्यक भूषण ढबाळे व अनिल पाटील, आरोग्य सहाय्यक (महिला) केरबिन डिसोझा व नम्रता गायकवाड आणि वाहनचालक अशोक पाटील अशा १३ अधिकारी, कर्मचारी व शिक्षक यांना मान्यवरांच्या शुभहस्ते शाल, पुष्पगुच्छे व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली.

या वेळी अनेक अधिकारी, कर्मचारी यांनी मनोगते व्यक्त करीत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यासोबतचे अनुभव कथन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सत्कारमुर्तींच्या वतीने प्रातिनिधीक स्वरूपात कार्यकारी अभियंता गिरिष गुमास्ते यांनी मनोगत व्यक्त केले व सत्काराबद्दल आभार मानले.

## निवडक

### मुख्याध्यापक ओव्हाळ यांची सेवापूर्ती




**मुरूड** : तालुक्यातील नांदगावच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांना विद्यालयातर्फे भावपूर्ण निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहजीवन विद्यामंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे होते. ज्येष्ठ संचालक ॲड. इस्माईल घोले, मुख्याध्यापिका अर्चना खोत यांनी ओव्हाळ सरांबद्दल गौरवोद्‌गार काढले. या वेळी पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, सागर राऊत, निवृत्त शिक्षक उदय खोत, महेश वाडकर, योगेश पाटील आदींनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. शिक्षकांतर्फे त्यांना सोन्याची अंगठी, शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन अध्यक्ष घलटेंच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी संचालक कृष्णा अंबाजी, अरविंद भंडारी, गणेश गाणार, मुश्ताक झोंबडकर, तसेच शाळेतील शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### शिरवलीवाडी शाळेत छत्री वाटप



**खोपोली** : खालापूर बार असोसिएशन अध्यक्ष ॲड.सचिन चाळके यांच्या माध्यमातून शिरवलीवाडी येथील जि.प. शाळेत मंगळवारी (दि.२) वृक्षारोपण करीत विद्यार्थ्यांना छत्री वाटप करण्यात आले. या वेळी खालापूर बार असोसिएशन उपाध्यक्ष ॲड. सोमनाथ दळवी, सेक्रेटरी ॲड.गजानन पवार, सामाजिक कार्याध्यक्ष ॲड.जयेश तावडे, खजिनदार ॲड. मनोज पाटील, ॲड. रितेश पाटील, माजी अध्यक्ष ॲड. नितीन गायकवाड, संघटना सदस्य ॲड. मुनिदास गायकवाड, ॲड. भगवान लाले, ॲड. सनी बेलसेकर, ॲड. अनिकेत विचारे, शिक्षक संजय पाटील, मनिषा जाधव, विद्यार्थी उपस्थित होते.

### पेण पोलीस निरीक्षकपदी संदीप बागुल



**पेण** : पेणमध्ये गेली अडीच ते तीन वर्षे कार्यरत असणारे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांची बदली नवी मुंबई येथे झाली असून त्यांच्या जागी संदीप अभिमन्यू बागुल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आचारसंहिता संपताच मुंबई, नवी मुंबई परिसरातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या शासनाच्या गृहखात्याच्या वतीने करण्यात आल्या. यामध्ये मुंबई लोहमार्ग, ठाणे, अलिबाग येथे कार्यरत असणारे कार्यक्षम पोलीस अधिकारी संदीप बागुल यांची पेण पोलीस ठाणे येथे बदली केली असून त्यांनी तत्काळ चार्ज हाती घेतला.

### वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे मोठ्या संख्येने वाहने दाखल होत आहेत. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.२) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १७२ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ५० हजार ६०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या धडक कारवाईमुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# विद्यार्थ्यांनी शिकून भविष्यात उच्च पदावर पोहचावे

## ◆ आमदार रविशेठ पाटील यांचे जिते येथे मार्गदर्शन

**पेण : प्रतिनिधी**

आपल्या तालुक्यातील विद्यार्थी चांगले शिकून भविष्यात मोठे अधिकारी झाले पाहिजेत. त्यांना शिक्षणाची गोडी लागली पाहिजे यासाठी येथील शाळा सुसज्ज व सर्व सोयीसुविधायुक्त हवी म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत. जिते गावाच्या विकासात आणखी भर पडणार आहे, असे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी जिते येथील जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमाराच्या भूमिपूजन कार्यक्रमप्रसंगी केले.



तालुक्यातील जिते विभागातील जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते.

भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी, जिते गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये पटसंख्या बऱ्यापैकी असताना होणाऱ्या नवीन शाळेत पटसंख्या वाढणार आहे कारण जिल्हा परिषदेतील जितेमधील शाळेत पहिलीपासून सेमी इंग्रजी वर्ग सुरू होणार असून याचा फायदा विद्यार्थ्यांसह पालकांना होणार आहे. लवकरच जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आणि सरपंच सुप्रिया लीलाधर म्हात्रे, सदस्य यांच्या प्रयत्नाने भव्य दिव्य जिल्हा परिषद शाळा होत असून याचा फायदा येथील पालकांना आणि विद्यार्थ्यांना होणार असल्याचे सांगितले.

या वेळी जि. प माजी सदस्य डी. बी. पाटील, सरपंच सुप्रिया लीलाधर म्हात्रे, खारपाडा सरपंच नेत्रा घरत, मनसेचे संदीप ठाकूर, खरोशी सरपंच महेश पाटील, खारपाडा उपसरपंच संजय घरात, सदस्य निशाकर घरत, किसन पाटील, शिक्षक मनोज पाटील आणि इतर शिक्षक वृंद तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विजेची तार पडून तीन गाईंचा मृत्यू

## महावितरणकडे नुकसानभरपाई देण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वरई येथे विजेची तार तीन दुभत्या गायींच्या अंगावर पडल्याने त्या गायींचा मृत्यू झाला. महावितरण कंपनीकडून नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



छत्रपती शिवाजी नगरमध्ये राहणारे आणि मूळचे वरई येथील मोतीराम ठाकरे यांच्या तीन दुभत्या गायी वरई येथे मंगळवारी (दि.२) सकाळी चरायला सोडल्या होत्या. त्या गायींच्या अंगावर वीज वाहिनीची तार कोसळली आणि तिन्ही गायींचा तडफडून मृत्यू झाला. त्यानंतर तत्काळ महावितरण कंपनीला कळविण्यात आले आणि वीजवाहिनीवरील पुरवठा बंद करण्यात आला. मोतीराम ठाकरे यांनी महावितरणच्या कारभाराबद्दल संताप व्यक्त केला आहे.

साधारण एक लाख रुपयांचे नुकसान झाले असून महावितरण कंपनीने शेतकरी मोतिराम ठाकरे यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी माजी नगराध्यक्ष शरद लाड यांनी केली आहे. महावितरणचे कर्जत उपअभियंता प्रकाश देवके यांच्याशी संपर्क साधून लाड यांनी शेतकऱ्याच्या नुकसानीस महावितरण जबाबदार आहे. त्यामुळे महावितरण कंपनीने तत्काळ मदत करावी, अशी मागणी लावून धरली आहे.

महावितरणचे उपअभियंता प्रकाश देवके यांनी दहिवली विभागाचे सहाय्यक अभियंता यांना वरई दुर्घटनेचे पंचनामे करून प्रस्ताव महावितरणकडे पाठवण्याचे सूचना दिल्या आहेत.

# खोपोलीतील शेतकऱ्यांचा सन्मान

**खोपोली : प्रतिनिधी**

कृषी दिनाचे औचित्य साधत स्वामिनी महिला प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष कांचन जाधव यांनी वर्षभर शेतात राबणाऱ्या अन्नदात्याचा सन्मान सोमवारी (दि.१) वावोशी येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात करण्यात आला. प्रगतशील शेतकरी आणि महिला शेतकऱ्यांना आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

सोहळ्यासाठी खालापूर माजी नगराध्यक्ष शिवानी जंगम, संवाद मराठीचे संपादक बाबू पोटे, शिवसेनेचे संपर्क प्रमुख पंकज पाटील, रायगड प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष प्रशांत गोपाळे, आपटी ग्रामपंचायतीच्या सदस्य श्वेता मनवे उपस्थित होते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत कांचन जाधव यांनी यशस्वीपणे उद्योग उभा करून सामाजिक बांधिलकी जपत महिलांसाठी अनेक उपक्रम राबवित असल्याबद्दल आमदार थोरवे यांनी त्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वामिनी प्रतिष्ठानच्या उपाध्यक्ष अश्विनी डोखले यांनी केले.




# भाले विद्यालयातील विद्यार्थी रमले शिवारात

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड भाताचे कोठार म्हणून प्रसिद्ध आहे. विशेषतः डोंगराळ भागात नाचणी, वरी अशी पिके घेतली जातात. मुलांना नेमकी शेती कशी केली जाते हे प्रत्यक्षात अनुभवण्यासाठी सुशिलाताई पवार विद्यालय भाले येथील विद्यार्थी रमेश धनावडे यांच्या शेतात उतरले. विद्यार्थ्यांनी पुस्तकातून लागवड अभ्यासली होतीच, मात्र प्रात्यक्षिकातून लागवडीचा हा धडा मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता.



नाचणी मधुमेहाच्या व्यवस्थापनासाठी उपयुक्त आहे. नाचणीमध्ये अनेक फायटोकेमिकल्स असतात ज्यात कर्करोगविरोधी गुणधर्म असल्याचे आढळून आलेले आहेत.

लहान मुले तसेच वाढत्या मुलांसाठी उत्कृष्ट आहार आहे. यामध्ये प्रथिने, कॅल्शिअम, लोह, जस्त आणि इतर आवश्यक पोषक तत्त्वे भरपूर प्रमाणात असतात अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापिका रचना राम कळमकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. या वेळी भाले सरपंच दत्ताराम खांबे, बाळाराम यादव, भागाराम मंचेकर, भीम धाडवे, दिनेश उमासरे, मारुती धनावडे, सहाय्यक शिक्षक नितीन उभारे, विलास शिरसे, मनोज भोईर, निखिल धनावडे, शिपाई प्रशांत यादव, जयदास नटे यांसह विद्यार्थी उपस्थित होते.

# माणगावात तालुकास्तरीय पाककला स्पर्धा

**माणगाव : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व विधान परिषदेचे माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून व रायगड जिल्हा राष्ट्रवादीचे अध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष उमा मुंढे, तालुकाध्यक्षा संगीत बक्कम, शहराध्यक्ष योगिता चव्हाण यांच्या मार्गदर्शनखाली माणगावात महिलांसाठी तालुकास्तरीय शोध सुगरणीचा पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा सरालादेवी मंगल कार्यालय हॉल येथे शनिवारी (दि.६) होणार आहे.

स्पर्धेसाठी आकर्षक अशी बक्षिसे ठेवण्यात आले आहेत. प्रथम क्रमांक रेफ्रिजरेटर, द्वितीय क्रमांक मायक्रोवेव्ह ओव्हन, तृतीय क्रमांक मिक्सर, उत्तेजनार्थ डिनर सेट तसेच स्पर्धेत सहभाग घेतलेल्या सर्व महिला स्पर्धकांना आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे.

कोकणात पिकणाऱ्या पदार्थांपासून (धान्य, फळ, भाज्या, नारळ) बनवलेला खाद्यपदार्थ घरी बनवून घेऊन येणे व त्याची रेसिपी याची मांडणी करून कागदावर व्यवस्थित लिहून मागील बाजूस आपले संपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल नंबर लिहिणे आवश्यक आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कार्यकर्त्या किशोरी हिरवे (९६३७८९१२२७), नगरसेविका सुविधा खैरे (९०४९७१०२१७), देविका पाबेकर (९८५०८०२४०९), अरुण शेठ (८१४९३७३६४१) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन महिला तालुकाध्यक्षा संगीता बक्कम, शहराध्यक्ष योगिता चव्हाण यांनी केले आहे.

# कर्जतमध्ये रानभाज्या महोत्सवाला मोठा प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत कृषी विभागाचे वतीने कृषी दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कृषी दिनानिमित्त रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

कर्जत तालुका कृषी विभाग यांच्या माध्यमातून कृषी दिनाचे आयोजन कशेळे येथील हनुमान मंदिर येथे करण्यात आले होते. या कृषी दिनाचे कार्यक्रमात रानभाज्या महोत्सव, शेतकऱ्यांना शेतीपिकाचे माहिती देण्यासाठी कोकण कृषी विद्यापीठ कर्जत भात संसोधन केंद्र येथे करण्यात आले होते, तसेच शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेत एक रुपयात पीक विमा काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन उपविभागीय कृषी अधिकारी नितीन फुलसुंदर, तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी, सचिन केंने, मंडळ कृषी अधिकारी मंगेश गलांडे, किरण गंगावणे, शशिकांत गोसावी तसेच पर्यवेक्षिका आणि कृषी सहाय्यकांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रगत शेतकरी काळूराम निरगुडे यांना पेरू लागवडीबद्दल, अनिल जोशी यांना बटाटा लागवडीबद्दल तसेच सुरेखा मते यांना मसाला कांडप यंत्रणा उभारण्यासाठी तर पांढरा कांदा उत्पादनासाठी अंकुश शेळके तसेच लाल भेंडी पिकविणारे नवनाथ शेळके तर रक्तचंदन शेतीबद्दल अर्जुन झुगरे आणि कृषी विभागाच्या योजनांच्या प्रसार, प्रचारासाठी संतोष पेरणे या सर्वांचा सन्मान करण्यात आला.

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कर्जत भातसंशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. विजय सागवेकर यांनी भाताच्या उत्पादनाबाबत सविस्तर माहिती दिली, तसेच डॉ. व्ही. पी. दामोदर तसेच कीटक शास्त्रज्ञ डॉ. वैशाली सावंत यांनी मार्गदर्शन केले. कृषी विभागाचे शशिकांत गोसावी यांनी फळबाग योजनांची माहिती दिली.

रानभाज्या महोत्सवात सुषमा सचिन पाटील यांच्या शेवळ्याचे सूप या उत्पादनास प्रथम क्रमांक तर नेहा नरेश मते यांचे वळकांदाचे काप या पदार्थास दुसरा, तिसरा क्रमांक सुरेखा संदेश मते यांच्या कड्याच्या शेंगांची भाजी आणि चौथा क्रमांक वनिता दामोदर जामघरे यांच्या मोदुड्याची भाजी यास देण्यात आले. अधिकारी वर्गात अनुराधा अंधारे, कल्याणी कोरपड यांच्या प्रकल्पांनादेखील उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आले. सर्वांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

### विविध रानभाज्यांचे प्रदर्शन

*रानभाज्या महोत्सवात भारंगी, शेवगा, आलू, ओले बिर्डे, कुरडू, टाकळा, लोत, घोळ, सराटा, भापले, कोळू, माठ, चायवळ, करटोली आदी भाज्या तर त्या सुकलेल्या भाज्या यांच्यापासून बनवलेली वळकांदाचे कांद, कुड्याच्या शेंगा, शेवळाची भाजी, तेलपटाची भाजी, मोडुदेची भाजी, सुकलेली लोत, भारंगीची भाजी, नळीची भाजी, सुरणाचे काप, अळू वडी यांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.*

# रोटरी क्लब ऑफ रोहाचा पदग्रहण सोहळा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ रोहाचा पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात झाला. या वेळी सन २०२४ व २०२५करिता किरण ताठरे यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. त्यांच्यासह प्रदीप चव्हाण, वरूण दिवाण, विदुला परांजपे आदींनी पदभार स्वीकारला.

या सोहळ्यास रोटरी डिस्ट्रिक्ट प्रांतपाल शीतल शाह व एजी डॉ. दिपक खोत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करून प्रमुख मान्यवरांच्या हस्ते गणेश प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. या वेळी नूतन अध्यक्ष किरण ताठरे यांना संजय नारकर यांनी कॉलर, पीन व चार्टर प्रदान करून अध्यक्षपदाची सूत्रे दिली, तसेच प्रदीप चव्हाण सचिव, वरुण दिवाण खजिनदार आणि विदुला परांजपे यांनी डायरेक्टर पदाचा पदभार स्वीकारला. मावळते अध्यक्ष संजय नारकर यांनी वर्षभरातील केलेल्या कार्याचा आढावा तपशीलवार सांगत त्यांच्या कार्यकाळात मुख्यत्वे रोटरी कॅलेंडर व फॅशन शो या दोन नवीन उपक्रमांची सुरुवात करता आली आणि त्यासाठी संपूर्ण रोटरी फॅमिलीची साथ लाभली याचे समाधान मानले. दोन नवीन सदस्यांना सदस्यत्व देण्यात आले. डिस्ट्रिक्ट गव्हर्नर शीतल शाह यांनी संजय नारकर यांनी राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्टच्या अध्यक्ष मनीषा नगरकर, संतोष नगरकर, क्लबचे अन्य मेंबर्स तसेच रोहा सिटीझन फोरमचे अध्यक्ष प्रदीप देशमुख, शिवऊर्जा समूहाचे सचिन व समीर दळवी, लायन्स क्लबचे अब्बास रोहवाला आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वप्नील धनावडे यांनी केले तर प्रेसिडेंट नॉमिनी राजेंद्र पोकळे यांनी आभार मानले.



# टीम इंडिया बार्बाडोसवरून रवाना

## आज घेणार पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अखेर टीम इंडियाला घेऊन एअर इंडियाचे विमान बार्बाडोसमधून भारताकडे झेपावले आहे. गुरुवारी (दि.४) सकाळपर्यंत भारतीय संघ दिल्लीत पोहचणार आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी सकाळी ११ वा. टीम इंडियातील खेळाडूंची भेट घेणार आहे. या वेळी खेळाडूंचा सत्कारदेखील करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

टीम इंडियाने २९ जून रोजी दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून टी-२० विश्वचषकावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक विजयानंतर संपूर्ण देश आपल्या टीमचे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे, मात्र टीम इंडिया अजूनही बार्बाडोसमध्ये अडकून पडली. बेरिल चक्रीवादळामुळे येथील विमानतळ बंद करण्यात आले होते. त्यामुळे संपूर्ण शहरात संचारबंदीसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती, मात्र



नुकतीच टीम इंडिया बार्बाडोसमधून भारताकडे यायला निघाली आहे. बेरीस चक्रीवादळाच्या संकटामुळे भारतीय संघ बार्बाडोसला अडकून होते परंतु बीसीसीआयने खेळाडूंसाठी, त्यांच्या घरच्यांसाठी, बीसीसीआय अधिकाऱ्यांसाठी, आणि स्पोर्ट्स स्टाफसाठी चार्टड प्लेनची व्यवस्था केली आहे. चार्टड प्लेनमधून टीम इंडिया अमेरिकेच्या दिशेने रवाना झाली आहे. अमेरिकेहून दुबई आणि मग तिथून दिल्ली एअर पोर्टवर हजर होणार आहे.

टीम इंडिया बार्बाडोसहून निघाली असल्याचा एक व्हिडीओ स्पोर्ट्स तकने सोशल मीडियावर शेअर केला आहे. आता प्लॅनद्वारे ते अमेरिकेला जातील आणि मग तिथून दुबई इंटरनेशनल एअरपोर्टवरून रात्रीच्या सुमारास प्लेन पकडून गुरुवारी सकाळी ६ वा.च्या सुमारास दिल्ली इंटरनेशनल एअरपोर्टवर दाखल होतील. ५ जुलैला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार समारंभ पार पडेल. भारतीय संघाच्या स्वागतासाठी बीसीसीआयने चांगलीच कंबर कसली आहे. भारतीय संघ दुपारी १ वा. दिल्लीहून मुंबईला येण्यासाठी विमानात बसेल. साधारण दोन-दोन तासांत ते मुंबईला पोहचतील. मुंबईच्या विमानतळावरून ते नरीमन पॉईंटला पोहोचतील. त्यानंतर नरीमन पॉईंट ते वानखेडे स्टेडियम ते खास बसने प्रवास करतील. ही बस २००७सारखीच छत नसलेली असेल. या वेळी भारतीय संघातील खेळाडू चाहत्यांचे अभिवादन स्विकारतील. त्यानंतर तिथून ते थेट वानखेडे स्टेडियमवर जातील.

वानखेडे स्टेडियमवर बीसीसीआयने भारताच्या खेळाडूंसाठी एक खास कार्यक्रम ठेवला आहे. या कार्यक्रमात भारताच्या खेळाडूंचा खास सत्कार होईल आणि त्यानंतर भारतीय संघाला बीसीसीआयने जाहीर केलेली रक्कम देण्यात येणार आहे. भारतीय खेळाडूंना यावेळी खास पोषाख दिला जाणार असल्याचेही म्हटले जात आहे.

# हार्दिक पंड्या टॉप ऑफ द वर्ल्ड!

## ऑलराऊंडर खेळाडूंच्या यादीत अव्वल स्थानी

**दुबई : वृत्तसंस्था**



टी-२० वर्ल्डकपची फायनल ओव्हर, प्रतिस्पर्धी संघ असलेल्या दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी सहा चेंडूत १६ धावांची गरज आणि फलंदाजीला डेव्हिड मिलरसारखा धोकादायक अशा कठीण परिस्थितीत गोलंदाजी करून संघाला वर्ल्डकप जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा भारताचा स्टार ऑलराऊंडर हार्दिक पंड्याला आयसीसीकडून मोठे बक्षीस मिळाले आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने टी-२० वर्ल्डकप स्पर्धेनंतर ताजी क्रमवारी जाहीर केली आहे. ज्यात ऑलराऊंडर खेळाडूंच्या यादीत हार्दिकने अव्वल स्थानी झेप घेतली आहे. हार्दिकने श्रीलंकेच्या हसरंगा याला मागे टाकले.

टी-२० वर्ल्डकपच्या अंतिम सामन्यात हार्दिकने हेन्रिक क्लासेन आणि डेव्हिड मिलर या दोन महत्त्वाच्या फलंदाजांना बाद केले होते. फक्त अंतिम सामन्यात नाही तर संपूर्ण स्पर्धेत हार्दिकने फलंदाजी आणि गोलंदाजीत निर्णायक अशी भूमिका बजावली होती. त्याच्या या कामगिरीचे बक्षीस त्याला आयसीसीच्या क्रमवारीत मिळाले. टी-२० क्रमवारीत अव्वल स्थानी पोहचणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.

भारतीय संघातून खेळताना हार्दिकने खालच्या क्रमांकावर येत बॅटने प्रभावी कामगिरी केली, तर गोलंदाजीत मोक्याच्या क्षणी विकेट घेत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. संपूर्ण स्पर्धेत हार्दिकने १५० हून अधिकच्या स्ट्राइक रेटने १४४ धावा तर ११ विकेट घेतल्या. हार्दिकची सर्वांत प्रभावी कामगिरी ठरली ती फायनल मॅचमध्ये होय. त्याने क्लासेनची विकेट घेत आफ्रिकेला मोठा धक्का दिला. त्यानंतर अखेरच्या ओव्हरमध्ये १६ धावांचे सरंक्षण केले आणि विजेतपद मिळून दिले. ऑलराऊंडर खेळाडूंच्या यादीत पहिल्या १०मध्ये हार्दिक एकटाच भारतीय आहे. त्यानंतर अक्षर पटेल आहे जो क्रमवारीत १२व्या स्थानावर आहे. टी-१० वर्ल्डकप फायनलनंतर त्याने ७ स्थानांनी उडी घेत १२वे स्थान मिळवले आहे. ही त्याची करिअरमधील सर्वोत्तम कामगिरी आहे.

## अभिनंदन..



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी विद्यालयातील अन्वी निकम हिने राष्ट्रीय किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२४मध्ये रौप्यपदक आणि महापालिका किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२४मध्ये सुवर्णपदक पटकाविले, तर प्रणव लबडे याने महापालिका किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत रौप्यपदक पटकाविले. याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे उपस्थित होत्या.**

# पेनल्टीच्या नाट्यात पोर्तुगालचा विजय

## स्लोव्हेनियावर ३-० ने मात करीत उपांत्यपूर्व फेरीत

**फ्रँकफर्ट : वृत्तसंस्था**

पोर्तुगालच्या रोनाल्डोकडून सामन्याच्या अतिरिक्त वेळेत हुकलेली पेनल्टी आणि पेनल्टी शूटआऊटमध्ये स्लोव्हेनियाच्या खेळाडूंना पहिल्याच तीन पेनल्टीमध्ये आलेले अपयश अशा नाट्यात पोर्तुगालने स्लोव्हेनियाचा ३-० असा पराभव करून युरो फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

सामना अतिरिक्त वेळेतच जाणार हे स्पष्ट दिसत असताना अतिरिक्त वेळेच्या पूर्वार्धात पोर्तुगालच्या रोनाल्डोला मिळालेली पेनल्टीची संधी साधता आली नाही. स्लोव्हेनियाचा गोलरक्षक यान ओब्लाकने रोनाल्डोची किक सुरेख अडवली. त्यानंतर शूटआऊटमध्ये पोर्तुगालचा गोलरक्षक डिओगो कोस्टाने स्लोव्हेनियाच्या पहिल्या तीनही पेनल्टी यशस्वीरीत्या अडवून पोर्तुगालचा विजय साकार केला. युरो स्पर्धेत तीन पेनल्टी अडवणारा कोस्टा पहिला गोलरक्षक ठरला. पोर्तुगालची गाठ



उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सशी पडणार आहे.

सामन्यात पोर्तुगालनेच अधिक संधी मिळविल्या, पण त्या सर्व वाया गेल्या. त्यामुळेच शूटआऊटमध्ये सलग तीन किक अडवणाऱ्या कोस्टाचा विजयात मोठा वाटा राहिला. नियोजित वेळेसह शूटआऊटपर्यंत कोस्टाने केलेले गोलरक्षण अधिक लक्षात राहिले. नियोजित वेळेत आघाडीपटू बेंजामिन व्हेर्बिचला यशस्वी अडवल्यानंतर कोस्टाने शूटआऊटमध्ये जोसिप इलिसिच, ज्युर बाल्कोवेच, बेंजामिन यांच्या किक शिताफीने अडवल्या. संपूर्ण सामन्यात पोर्तुगाल संघ नेहमीसारखा प्रभाव पाडू न शकल्यामुळे कोस्टाच्या कामगिरीला जास्त महत्त्व येते. हा माझ्या कारकीर्दीतला सर्वोत्तम सामना म्हणावा लागेल. मला जे काही करता येईल, ते करायचे इतकेच माझे नियोजन होते. मी माझ्या भावना बरोबर घेऊनच उतरलो. स्लोव्हेनियाकडून कोण पेनल्टी घेऊ शकतो याचा आम्ही अभ्यास केला होता. प्रत्यक्षात त्यांनी क्रमवारीत बदल केला. त्यामुळे मलाही नियोजन बदलणे भाग पडले. उपांत्य फेरी गाठण्याचा आनंद मला आहेच. त्याहीपेक्षा आपले योगदान संघाच्या उपयोगी पडले याचा अधिक आनंद झाला, असे कोस्टाने सांगितले.

सामन्यात रोनाल्डो आपला लौकिक अद्याप दाखवू शकलेला नाही. अत्यंत कठीण काळातही मी कायम खंबीरपणे उभा राहिलो. आता जेव्हा संघाला माझी गरज होती, तेव्हा मी खेळू शकलो नाही याचे मला अधिक वाईट वाटते. सामन्याची सुरुवात वाईट झाली, पण कोस्टाने शेवट गोड केला, असे रोनाल्डो म्हणाला.

### विम्बल्डन टेनिस स्पर्धा

# गतविजेती वोंड्रोउसोवा पहिल्याच फेरीत गारद



**लंडन : वृत्तसंस्था**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेची गतविजेती चेक प्रजासत्ताकच्या मार्केटा वोंड्रोउसोवाला महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत गाशा गुंडाळावा लागला, तर अमेरिकेची जेसिका पेगुला व कोको गॉफ तसेच जपानची नाओमी ओसाका यांनी पुढच्या फेरीत आपले स्थान निश्चित केले. पुरुष एकेरीत इटलीच्या अग्रमानांकित यानिक सिन्नेर, नोव्हाक जोकोविच व अ‍ॅलेक्झांडर झ्वेरेवने दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले.

महिला एकेरीच्या सामन्यात वोंड्रोउसोवा सहज विजय मिळवले असे दिसत होते, मात्र स्पेनच्या युवा जेसिका मानेइरोने वोंड्रोउसोवाला स्थिरावून देता ६-४, ६-२ असा विजय मिळविला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच जेसिकाने वोंड्रोउसोवाला दबावाखाली ठेवले व तिला पुनरागमन करण्याची संधी दिली नाही. ३० वर्षांपूर्वी गतविजेत्या स्टेफी ग्राफलाही अशाच पद्धतीने पहिल्या फेरीत पराभूत व्हावे लागले होते.

अन्य सामन्यांत, पाचव्या मानांकित पेगुलाने अमेरिकेच्या अ‍ॅश्लेन क्रुएगरला ६-२, ६-० असे पराभूत केले. गॉफनेही कॅरोलिन डोलेहाइवर ६-१, ६-२ असा सरळ सेटमध्ये विजय नोंदवला. तर, ओसाकाने संघर्षपूर्ण लढतीत फ्रान्सच्या डिआने पेरीला ६-१, १-६, ६-४ असे नमवले. चौथ्या मानांकित कझाकस्तानच्या एलिना रायबाकिनाने रोमानियाच्या एलिना गॅब्रिएला रुसवर ६-३, ६-१ असा सरळ सेटमध्ये विजय होत पुढच्या फेरीत धडक मारली.

# विविध क्रीडा प्रबोधिनीमध्ये खेळाडूंकरिता नवीन प्रवेश

## इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सन २०२४-२५साठी शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत नऊ क्रीडा प्रबोधिनीत सरळप्रवेश (५० टक्के) व कौशल्य चाचणी (५०टक्के) प्रक्रियेंतर्गत निकषानुसार निवासी व अनिवासी प्रवेश देण्यात येणार असून खेळांडूनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनुर यांनी केले आहे.

महाराष्ट्रातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी राज्यातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करून त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार व अद्यावत क्रीडा सुविधा पुरवून त्यासाठी सुसंघटीत प्रयत्न करण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती क्रीडापीठ म्हाळुंगे-बालेवाडी पुणे अंतर्गत राज्यात विविध क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. या प्रवेश प्रक्रियेसाठी पुढीलप्रमाणे नियम अटी व शर्ती राहणार आहेत.

राज्यात पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, गडचिरोली अशा नऊ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली होती. या ठिकाणी क्रीडा प्रबोधिनीमध्ये क्रीडा प्रशिक्षणार्थीची निवड करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. या क्रीडा प्रबोधिनीमध्ये ज्युदो, जिम्नॅस्टीक्स, हॉकी, शुटींग, फुटबॉल, जलतरण, अ‍ॅथलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन, आर्चरी, हॅन्डबॉल, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, ट्रायथलॉन, सायकलिंग, बॉक्सिंग अशा १७ क्रीडा प्रकारात प्रशिक्षण देण्यात येते.

**सरळ प्रवेश प्रक्रिया :** क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधीत्व केलेले खेळाडू ज्यांचे वय १९ वर्षे आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाबाबतची चाचणी तज्ञ समिती समक्ष देऊन प्रवेश निश्चत केला जातो.

**खेळनिहाय कौशल्य चाचणी :** क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळत राज्यस्तरावर सहभागी खेळाडूंना ज्यांचे वय १९ वर्षाआतील आहे, अशा खेळाडूंना संबंधित खेळाच्या खेळनिहाय कौशल्य चाचणीचे आयोजन करून गुणानुक्रमे प्रवेश निश्चित केला जातो.

**वैद्यकीय चाचणी :** उपरोक्त चाचण्यांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय पथकाद्वारे चाचणी घेऊन क्रीडा प्रबोधिनीमध्ये शारिरिकदृष्ट्या सुदृढ खेळाडूची निवड अंतिम करण्यात येते.

निकषामध्ये पात्र खेळाडूंनी जिल्हास्तरावर क्रीडा प्रबोधिनी विभाग चाचणीसाठी सहभागी होण्याकरिता नावे नोंदणी ५ जुलैपूर्वी जिल्हा किडा अधिकारी कार्यलय, रायगड येथे विहीत नमुन्यातील अर्जासह करण्यात यावी. खेळाडूचे नाव, जिल्हा, खेळ प्रकार, जन्मदिनांक (जन्मतारखेचा दाखला, बोनाफाईड सर्टिफिकेट व आधारकार्ड), वय व क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र (राज्य/राष्ट्रीय स्पर्धा प्रमाणपत्रे) याबाबत माहितीसह नोंदणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली - संगम ता.अलिबाग, जि. रायगड येथे करण्यात यावी.

मुंबई विभागांतर्गत जिल्ह्यातून प्रवेशिकानुसार खेळाडूंची खेळनिहाय चाचण्या घेण्यात येतील. विभागस्तरीय क्रीडा कौशल्य चाचणीचे आयोजन ८ ते ९ जुलैदरम्यान करण्यात येतील व विभागस्तरावरून निवड करण्यात आलेल्या खेळाडूंचा प्रवेश अर्ज राज्यस्तरावरील चाचणीसाठी पाठविण्यात येतील.



# उत्तम धुरी, विजय कांबळे, अंकुश सावंत ठरले उत्कृष्ट पंच

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने राज्य सीनियर पॉवर लिफ्टिंग स्पर्धा मुंबई येथे नुकतीच पार पडली. शिवडी- वडाळा येथील ज्ञानेश्वर महाविद्यालय येथे २९ ते ३० जूनदरम्यान स्पर्धा झाली. महाराष्ट्रातून अनेक जिल्ह्यातून नामवंत सिनियर पुरुष व महिला खेळाडू या स्पर्धेसाठी आले होते.

या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पंच म्हणून प्रथम क्रमांक उत्तम धुरी (मुंबई), द्वितीय क्रमांक विजय कांबळे (कोल्हापूर) आणि तृतीय क्रमांक अंकुश सावंत (मुंबई) यांना देण्यात आला.

महाराष्ट्र राज्य संघटनेचे सचिव शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिक सहाय्य केंद्र विश्वस्त मंडळ यांच्या सहकार्याने स्पर्धा झाली. याप्रसंगी ज्येष्ठ क्रीडा पत्रकार सुहास जोशी, मधुकर पाटकर (शिवछत्रपती क्रीडा कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त), शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय पदक विजेते आणि माजी पोलीस अधिकारी रक्षा महाराव आदी उपस्थित होते.

# ...म्हणून प्रशिक्षक द्रविडने मानले रोहितचे आभार; सूर्यकुमारने केला खुलासा

**बार्बाडोस : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने रोहित शर्माच्त्र्या नेतृत्वाखाली आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या प्रशिक्षणाखाली टी-२० वर्ल्डकपचे जेतेपद पटकावले. द्रविड यांची भारताचे मुख्य प्रशिक्षक म्हणून ही अखेरची स्पर्धा होती आणि अखेरच्या सामन्यात आयसीसीचे जेतेपद पटकावणे यापेक्षा मोठी गोष्ट असूच शकत नाही. भारत वर्ल्ड चॅम्पियन ठरल्यानंतर द्रविड यांनी रोहित शर्माचे नोव्हेंबरमध्ये केलेल्या फोन कॉलसाठी आभार मानले, ज्याचा खुलासा सूर्यकुमार यादवने केला आहे.

वर्ल्डकप फायनलच्या दुसऱ्या दिवशी एका मुलाखतीमध्ये सूर्यकुमार यादवने



अनेक गोष्टींचा खुलासा केला. वर्ल्डकप पूर्वीच्या तयारीपासून ते फायनल सामन्यापर्यंत आणि विजयानंतरच्या सेलिब्रेशनपर्यंत बऱ्याच गोष्टी सांगितल्या. यादरम्यान सूर्याने राहुल द्रविड यांच्या योगदानाबद्दलही सांगितले.

सूर्या म्हणाला, लोकांच्या अपेक्षा, दबाव आणि खेळाडूंना दिलासा देणारी 'भिंत' राहुल द्रविड यांनी निर्माण केली आहे. त्यांनी आपला अनुभव कधीच कोणावर लादला नाही. ते इतरांना समजून घेतात आणि बाकीचेही काय विचार करीत आहेत याचाही विचार त्यांच्या मनात सुरू असतो. त्यांचे योगदान मोठे होते, त्याची विनोदबुद्धीही कमाल आहे.

द्रविड यांच्या ट्रॉफी हातात घेतल्यानंतरच्या सेलिब्रेशनचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. अगदी खेळाडूंपेक्षा अधिक त्यांनी ती ट्रॉफी हातात आल्यावर जल्लोष केला होता. याबाबत सांगताना सूर्या म्हणाला, तो ३० सेकंदाचा व्हीडिओ, जेव्हा द्रविड यांनी ट्रॉफी हातात घेऊन जो जल्लोष करीत आपला आनंद व्यक्त केला तो क्षण काही वेगळाच होता. यानंतर द्रविड यांनी रोहितचे आभार मानले आणि म्हणाले, धन्यवाद रोहित, नोव्हेंबरमध्ये त्या फोन कॉलसाठी, कारण ५० षटकांच्या विश्वचषकातील भारताच्या पराभवानंतर द्रविड यांना भारताचे प्रशिक्षक म्हणून पुन्हा रूजू व्हायचे नव्हते, पण रोहित आणि जय सरांनी त्यांना मनवले होते, असे सूर्यकुमारने मुलाखतीत सांगितले.

### संघात सकारात्मकता पसरवली

टी-२० विश्वचषकापूर्वी द्रविड यांनी संपूर्ण भारतीय संघाने खेळलेल्या टी-२० सामन्यांच्या संख्येचा आलेख दाखवला. विराटपासून ते यशस्वी जैस्वालपर्यंत. ती संख्या ८०० पेक्षा जास्त होती आणि मग द्रविड यांनी दुसरी स्लाईड दाखवली ज्यात त्यांच्यासह संपूर्ण कोचिंग स्टाफने खेळलेल्या सामन्यांची संख्या होती, जी एक होती. यानंतर द्रविड आम्हाला म्हणाले, हे सर्व पाहता योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यासाठी सर्वोत्तम न्यायकर्ते आता तुम्हीच आहात. त्यामुळे इतर सर्व गोष्टी आमच्यावर सोडा आणि तुमच्या खेळाचा आनंद घ्या. यामुळे एक सकारात्मकता पसरली, असे सूर्यकुमार सांगितले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com